मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

पालघर-ठाणे | रायगड - रत्नागिरी | RNI No.: MAHAMAR/2014/62313 | गुरुवार, १० एप्रिल २०२५ | वर्ष: ११ | अंक: १४१ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## 18 अमेरिकन कंपन्यांवर चीनची कारवाई

**बीजिंग,दि. ९ प्रतिनिधी**

चीननं अमेरिकेवर पलटवार करत 84 टक्के टॅरिफ लादलं आहे. अमेरिकेला सावरण्याची संधी न देता चीननं आणखी एक निर्णय घेतला आहे. शी जिनपिंग यांच्या सरकारनं अमेरिकेच्या 18 कंपन्यांवर कारवाई केली आहे. यामध्ये 12 कंपन्यांना निर्यात नियंत्रण यादीत टाकलंय. तर, 6 अमेरिकन कंपन्यांना अविश्वसनीय संस्था असं संबोधलं आहे. चीनच्या वाणिज्य मंत्रालयानं 6 कंपन्यांवर तैवानला शस्त्र विकण्याचा त्यासह सैन्य तंत्रज्ञानाच्या सहकार्याचा आरोप केला आहे. त्यामुळं शिल्ड एआय आयएनसी, सिएर्रा नेवादा कॉर्पोरेशन, सायबरलक्स कॉर्पोरेशन, एज ऑटोनॉमी ऑपरेशन्स एलएलसी, ग्रुप डब्ल्यू , हडसन टेक्नोलॉजी कंपनी या कंपन्यांना अविश्वसनीय कंपन्यांच्या यादीत टाकण्यात आलं आहे.

## अग्राग्रलेख
## खरीखरी

### राज्यपालावर शरसंधान

तामिळनाडूचे राज्यपाल श्रीमान रवी आहेत. रवी म्हणजे सूर्य. पण हा रवी इतका तापला आहे की, त्याच्या ज्वालांमुळे तामिळनाडूच्या द्रमुकने त्यांच्याकडे पाठवलेली विधेयके अगदी मूक बनून गेली होती. सरकार आणि राज्यपाल यांच्यामध्ये जोरदार संवैधानिक संघर्ष सुरू होता. राज्यपाल हा राज्याचा प्रमुख आहे, असे घटना म्हणते. पण हा राज्यपाल दिल्लीत ज्यांचे सरकार सत्तेत आहे त्यांच्याद्वारे नियुक्त होतो. जनतेतून निवडले जातात ते लोकप्रतिनिधी, त्यातून मुख्यमंत्री आणि मंत्री म्हणजेच मंत्रिमंडळ, याच मंत्रिमंडळाने विधानसभेत पारित केलेली विधेयके मंजूर करणे किंवा पुढे विचारार्थ पाठवणे. हे राज्यपालाचे काम असते. त्यांच्या कामाची आठवण देण्याचे प्रसंग काही वर्षांपूर्वी पर्यंत फारसे आलेच नव्हते. राज्यपाल हा पक्षपातीपणा करणारा नसावा, असे म्हटले जाते. तरीही हा पक्षपातीपणा अगदी अट्टाहासपूर्वक दिसू नये आणि शक्यतोवर लोकनियुक्त सरकारची विधेयके पदोपदी अडवू नये. असे सर्वसाधारणपणे मानले जाते. ही प्रचलित रीत आजकाल अनेक राज्यपालांनी पाळायचीच नाही. असे ठरवल्यामुळे अनेक बाके प्रसंग उभे ठाकलेले होते. आपल्या महाराष्ट्राचे स्वनामधन्य कोशियारी नावाचे सदगृहस्थ महामहीम होते. हे महामहीम राजभवनात छोटे-मोठे कार्यक्रम अति होशियारीने घेऊन आपले मनोरंजन करून घेत असत. त्यावेळी उद्धव ठाकरे यांचे सरकार होते. त्यांनी पाठवलेली विधेयके किंवा शिफारसी अनेक वेळा आर्किमिडीजच्या सिद्धांताप्रमाणे एखादा घनपदार्थ एखाद्या द्रवात लोंबकळत असतो. त्याप्रमाणे लोंबकळत ठेवल्या. बहुमताच्या सरकारने विधान परिषदेसाठी पाठवलेल्या 12 आमदारांच्या नावाची यादी राजभवनात अक्षरशः कुजून सडून गेलेली होती. पण कोश्शारी यांची हुश्शारी अखेरपर्यंत टिकली. त्यामुळे तेव्हाचे होणारे आमदार काही त्यावेळी आमदार होऊ शकले नाहीत, ते असो. आजचा विषय तामिळनाडूचा आहे. तामिळनाडूच्या रवी नामक राज्यपालाने राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी दहा विधेयके रोखून धरली होती. अखेर तामिळनाडू सरकारने राज्यपाल महोदयांच्या या कृतीचा विरोध करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि आर महादेवन यांच्या खंडपीठाने राज्यपालांना असे काही फटकारले की, त्यांची म्हणजेच सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची स्तुती जेवढी करावी तेवढी कमीच आहे. त्यांनी एखादे विधेयक किती काळ रोखावे, अशी विचारणा केली. राज्यघटनेच्या कलम 200 नुसार विधेयकावरील निर्णयासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित केली गेलेली नाही. पण कालमर्यादा नाही म्हणून राज्यपालांनीही मर्यादा ओलांडू नये. त्या गोष्टींना अमर्यादपणे बांधून ठेवू नये. असे या सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने अधोरेखित केले. त्यानंतर ज्या तारखेला ही विधेयके राज्यपालांकडे पाठवली. त्या तारखेला मंजूर झाली आहेत, असे गृहीत धरावे असा निकाल दिला आहे. यापूर्वीही आपल्या महाराष्ट्राने आणि इथल्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतलेली होती. पण तारखांवर तारखा देऊन चंद्रचूड साहेब निवृत्त झाले तरी त्याचा निकाल लागला नाही. परिपूर्ण निकाल न लावता गोलमोल निकाल लावणे. हे महाराष्ट्राच्या सरकार बाबत चंद्रचूड साहेबांनी दिलेल्या निर्णयाचे हे मोठेच उदाहरण होते. तामिळनाडू सरकारची अनेक विधेयके राज्यपालांची पंखे कापणारीच होती. हे मान्य करूनही सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडू सरकारच्या विधेयकांना 'पारित झाले' असे घोषित केले. ही फार मोठी घटना आहे. त्यापुढे जाऊन सर्वोच्च न्यायालयाने कोणत्याही विधेयकावर एका महिन्याच्या आत निर्णय घ्यावा, असे आदेश दिलेले आहेत. राज्यपालांनी संबंधित विधेयक परत पाठवले आणि राज्याच्या विधी मंडळाने दुसऱ्यांदा मंजूर देऊन पाठवले असेल. तर ते विधेयक राज्यपालांनी एका महिन्याच्या आत मंजूर करावे. असा आदेशच दिला. जर राज्यपालांनी असे केले नाही. तर त्यांची किंवा त्यांच्या निर्णयाची न्यायिक समीक्षा केली जाईल, असेही सर्वोच्च न्यायालय म्हणते. हा निर्णय म्हणजे राज्यपाल पदावरील म्हणजे अगदी महामहीम असलेल्या त्या व्यक्तीसाठी सर्वोच्च न्यायालयाचा हा महाआदेश आहे. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. राज्यपाल पदावरील व्यक्ती पक्षनिरपेक्ष नसली. तरी त्याने पक्षसापेक्ष असू नये. एवढे भान राखले तरी त्यांच्यावर रवी साहेबांसारखी पाळी येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने कान टोचल्यामुळे आता इतर राज्यातही त्याचा फायदा त्या त्या राज्यांच्या सरकारांना होणार आहे. ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने देशाच्या राजकारणात समाधानाच्या वार्ता येत आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या ज्या न्यायमूर्तींनी अतिशय निरपेक्षपणे हा निर्णय दिला आहे. त्यांना देशातील सुजाण जनता धन्यवाद देईल. यात अजिबात शंका नाही.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# कर्ज स्वस्त होणार; रिझर्व्ह बँकेकडून रेपो दरात 25 बेसिस पॉर्इंट्सने कपात

## चालू आर्थिक वर्षासाठी जीडीपी वाढीचा अंदाज घटवला

**मुंबई,दि. ९ प्रतिनिधी**

रिझर्व्ह बँकेच्या सहा सदस्यीय चलनविषयक धोरण समितीने ९ एप्रिल रोजीच्या धोरण आढाव्यात रेपो दर २५ बेसिस पॉइंट्स ने कमी करून ६ टक्के करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे येत्या काही दिवसांत गृह, वैयक्तिक, वाहन आणि ठेवींवरील व्याजदर कमी होणार आहेत. दर निश्चित करणाऱ्या पॅनेलने चलनविषयक धोरणाची भूमिका तटस्थवरून अनुकूल अशी केल्याने रेपो दरात कपात करण्यात आली.



एमपीसीने २०२५-२६ मध्ये जीडीपी वाढ ६.७ टक्क्यांवरून ६.५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. २०२५-२६ मध्ये किरकोळ महागाई ४ टक्के राहण्याची अपेक्षा असल्याचंही एमपीसीने म्हटले आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापार कर लादल्याने जागतिक बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात अनिश्चितता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर सहा सदस्यीय एमपीसीने हा निर्णय घेतला. उच्च कर दरांमुळे महागाई, व्यापार तणाव वाढण्याची आणि जागतिक अर्थव्यवस्थेत घट होण्याची भीती असल्याने दर कपात करण्यात आली आहे.

"जागतिक आर्थिक दृष्टिकोन वेगाने बदलत आहे. आर्थिक वर्ष २०२६ ची सुरुवात चिंताजनक झाली आहे आणि काही जागतिक व्यापार संघर्ष प्रत्यक्षात येत आहेत", असे आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले. आरबीआयच्या चलनविषयक धोरण समितीने सलग दुसऱ्यांदा रेपो दरात २५ बेसिस पॉइंटची कपात केली. फेब्रुवारीच्या चलनविषयक धोरणात, एमपीसीने जवळजवळ पाच वर्षांत प्रथमच रेपो दर २५ बेसिस पॉइंटने कमी करून ६.२५ टक्के केला होता. महागाई कमी होत असताना आणि मंदावलेल्या वाढीच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला.

जानेवारी-फेब्रुवारी या कालावधीत महागाई सरासरी ३.९ टक्के आहे. आरबीआयच्या जानेवारी-मार्च २०२५ च्या तिमाही अंदाजापेक्षा ही सरासरी कमी आहे. आरबीआयने आर्थिक वर्ष २०२५ च्या चौथ्या तिमाहीत ग्राहक किंमत-आधारित महागाई (सीपीआय) ४.८ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला आहे.

**रेपो दर कपातीचा व्याजदरांवर कसा परिणाम होईल?**

रेपो दरात २५ बेसिस पॉइंट्सची कपात करून ६ टक्के करण्यात आल्यामुळे, त्याच्याशी जोडलेले सर्व बाह्य बेंचमार्क कर्ज दर त्याच फरकाने कमी होतील. कर्जदारांसाठी हा निर्णय दिलासादायक ठरेल, कारण गृह आणि वैयक्तिक कर्जावरील त्यांचे समान मासिक हप्ते २५ बेसिस पॉइंट्सने कमी होतील. फेब्रुवारीच्या पॉलिसी दरम्यान पॉलिसी रेपो दरात २५ बेसिस पॉइंट्सने कपात केल्यानंतर, बँकांनी त्यांचे रेपो-लिंक्ड बाह्य बेंचमार्क-आधारित कर्ज दर समान प्रमाणात कमी केले आहेत.

# मुंबईत सीएनजी आणि पीएनजी महागले

**मुंबई,दि. ९ प्रतिनिधी**

मुंबई आणि आसपासच्या परिसरात राहणाऱ्या लोकांना आता सीएनजी आणि पीएनजी म्हणजेच स्वयंपाकघरातील पाईप गॅससाठी जास्त पैसे मोजावे लागणार आहेत. महानगर गॅस लिमिटेड (एमजीएल) ने बुधवारपासून सीएनजीच्या किमतीत प्रति किलो १.५ रुपये आणि पीएनजीच्या किमतीत प्रति युनिट १ रुपये वाढ केली आहे. आता सीएनजीची नवीन किंमत प्रति किलो ७९.५० रुपये झाली आहे. तर पाईप गॅसची किंमत प्रति युनिट ४९ रुपये झाली आहे.

घरगुती गॅसच्या किमतीत वाढ आणि डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य वाढल्यामुळे गॅसच्या किमती वाढवाव्या लागल्याचे एमजीएलच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. मात्र, कंपनीचे म्हणणे आहे की सीएनजी अजूनही पेट्रोल आणि डिझेलपेक्षा स्वस्त आहे.

मुंबईत सुमारे ३ लाख ऑटो आणि २०,००० टॅक्सी सीएनजीवर चालतात. याशिवाय, ५ लाखांहून अधिक वाहने सीएनजीवर चालत आहेत. फेब्रुवारीमध्येच ऑटो आणि टॅक्सीच्या भाड्यात ३ रुपयांची वाढ करण्यात आली होती. आता पुन्हा किमती वाढल्यामुळे



प्रवाशांना जास्त खर्च करावा लागू शकतो.

मुंबईत २४ लाखांहून अधिक घरांमध्ये पाईपद्वारे गॅस वापरला जातो. आता दर महिन्याला गॅस बिलही थोडे वाढेल. मात्र, कंपनीचे म्हणणे आहे की पाईपद्वारे गॅस हा अजूनही एक सुरक्षित, आरामदायी आणि पर्यावरणाच्या दृष्टीने चांगला पर्याय आहे.

गेल्या ६ महिन्यांत सीएनजीच्या किमती वाढण्याची ही चौथी वेळ आहे. नोव्हेंबर आणि डिसेंबर २०२४ मध्येही किमती वाढल्या होत्या आणि आता एप्रिलमध्ये त्या पुन्हा वाढल्या आहेत. एमजीएलने म्हणले की त्यांच्याकडे ३५८ सीएनजी स्टेशन आहेत. लोकांना सहज गॅस मिळावा म्हणून आणखी स्टेशन उघडण्याची त्यांची योजना आहे.

## अमेरिकेने लादलेल्या व्यापार कराची भारतात अंमलबजावणी

**नवी दिल्ली, दि. ९ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प विविध देशांवर व्यापार कर लादले आहेत. त्यानुसार, भारतावरही २६ टक्के कर आकारण्यात आला आहे. भारतात या कराच्या अंमलबजावणीला आजपासून सुरुवात झाली असून भारताकडून अद्यापतरी यावर अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. परंतु, येत्या काळातील परिस्थितीचा अभ्यास करून सरकार यावर प्रतिक्रिया देईल, अशी अपेक्षा असल्याचं वृत्त रॉयटर्सने एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याच्या हवाल्याने दिलं आहे. दरम्यान, भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम कमी करण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाची एक महत्त्वाची बैठक होणार आहे. अमेरिकेबरोबर वाटाघाटी करण्याच्या दृष्टीने भारताने लक्ष केंद्रित केलं आहे. भारतावर अचानक २६ टक्के कर लादल्याने अनिश्चितता निर्माण झाली आहे. इतर राष्ट्रांवर लादण्यात आलेल्या करांपेक्षा भारतावर लादण्यात आलेला कर तुलनेने कमी आहे. ट्रम्प यांनी शेअर केलेल्या चार्टनुसार, भारतावर एकूण ५२ टक्के व्यापार कर लादण्यात आला आहे. हा आकडा वादग्रस्त आहे. जागतिक व्यापार संघटनेने भारताचा सरासरी कर १२ टक्क्यांच्या जवळ ठेवला आहे, त्यामुळे अमेरिकन प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्हे उपस्थित करण्यात आले.

## सात तासांनी सुप्रिया सुळेंनी उपोषण सोडले

**दोन मे रोजी रस्त्याच्या कामाला सुरुवात होणार**

**पुणे, दि. ९ प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील श्री क्षेत्र बनेश्वर (नसरापूर) येथील बनेश्वर फाटा ते वनविभाग कमान या पवित्र देवस्थानाकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झाली असून, या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्यासाठी वारंवार पाठपुरावा करूनही शासन आणि प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने अखेर खासदार सुप्रिया सुळे यांनी आज (दि. ९ एप्रिल) सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे उपोषणाला सुरुवात केली. जोपर्यंत रस्त्याच्या कामाची तारीख सांगत नाही. तोपर्यंत उपोषण सुरु राहणार असल्याचे सुळे यांनी सांगितले होते. अखेर त्यांनी 2 मे ला कामाला सुरुवात करण्याच्या कबुलीवर सुप्रिया सुळे यांनी उपोषण सोडलं आहे.

सुप्रिया सुळे यांनी पंधरा दिवसांमध्ये कामाला सुरुवात करा अशा प्रकारचं मत मांडलं होतं. त्यानंतर एक महिन्यांमध्ये कामाला सुरुवात करू अशा प्रकारचे पत्र जिल्हा परिषदेच्या सीईओ यांनी पाठवलं. परंतु आता सुवर्णमध्य काढत 22 दिवसानंतर म्हणजेच 2 मे ला कामाला सुरुवात करण्याच्या कबुलीवर सुप्रिया सुळे यांनी उपोषण सोडलं आहे.

सुप्रिया सुळे आज सकाळपासून



जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसल्या होत्या. प्रशासनाचे अधिकारी सुप्रिया सुळेंना उपोषणस्थळी भेटायला आले होते. यावेळी काम कधी सुरु होणार असल्याचे सुप्रिया यांनी विचारले. या कामाला अंदाजे ५० लाख लागत आहेत. डीपीसी कडून ते बजेट मंजूर आहे. आम्ही पावसाळ्यापूर्वी काम सुरु करू असे अधिकाऱ्यांनी सांगितले. मंत्री येतात तेव्हा रस्ता रात्रीतून तयार होतो. तुम्ही तारीख सांगा. ती सांगणार नसाल तर तुम्ही चहा घेवून जा असं अधिकाऱ्यांना सुप्रिया म्हणाल्या. तसेच १४ दिवसात काम सुरु करणार असाल तर उपोषण मागे घेणार नसल्याचे त्यांनी अधिकाऱ्यांना उपोषणस्थळी सांगितले. दिनांक 9 मे पर्यंत रस्ता कामाला सुरुवात करू असं अधिकारी म्हणत होते. पण अखेर सुवर्णमध्य काढत 22 दिवसानंतर म्हणजेच 2 मे ला कामाला सुरुवात असल्याच्या कबुलीवर सुप्रिया सुळेंनी उपोषण सोडले आहे.

# तुळजापुरात ड्रग्जचा बाजार

## पेडलर पुजाऱ्यांचे सर्वपक्षीय राजकीय कनेक्शन

**तुळजापूर, दि. ९ प्रतिनिधी**

तुळजापूर ड्रग प्रकरणात १३ पुजाऱ्यांचा संबंध असल्याचे उघड झाल्यानंतर आता या पुजाऱ्यांचे राजकीय कनेक्शन समोर आले आहे. या प्रकरणात सर्वच पक्षांचे मिलीभगत असल्याचं दिसून येत आहे. या प्रकरणातील राहुल परमेश्वर आणि सुमित शिंदे हे दोघे ठाकरेंच्या शिवसेनेचे कार्यकर्ते असल्याचा समोर आलं आहे. ड्रग प्रकरणातील या आरोपींचे खासदार ओमराजे निंबाळकरांसोबत फोटो व्हायरल झाल्याने काही दिवसांपूर्वी मोठी खळबळ उडाली होती. तर विश्वनाथ उर्फ पिंटू मुळे चंद्रकांत उर्फ बाबू कने,विनोद गंगणे, तुळजापूरचे माजी नगराध्यक्ष हे भाजपशी संबंधित आहेत. तुळजापूर प्रकरणात आत्तापर्यंत एकूण ३५ आरोपी आहेत त्यातले १४ आरोपी पुजारी असल्याचं सूत्रांचे म्हणणे आहे. पण या पुजाऱ्यांचा रोजच्या पुजाऱ्यांशी संबंध नाही असे पुजारीची भूमिका आहे.

काही दिवसांपूर्वीच तुळजापूर ड्रग प्रकरणात आरोपींसोबत फोटो व्हायरल झाल्या प्रकरणे खासदार ओमराजे निंबाळकर आणि भाजप आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांच्यात आरोपींवरून एकमेकांवर आरोप प्रत्यारोप सुरू झाले होते. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धीरज पाटील यांनी भाजप आमदार राणा जगजीत सिंह पाटील यांच्यावर तुळजापूर प्रकरणातील आरोपींचे फोटो दाखवत हे आरोपी राणा पाटील यांचे कार्यकर्ते असल्याचा दावा केला होता. तर खासदार ओमराजे निंबाळकर यांचे आरोपींसोबत फोटो ही व्हायरल झाले होते. या प्रकरणात सर्वच पक्षांचे आरोपी असल्याचे उघड होत आहे. त्यामुळे तुळजापूर ट्रक प्रकरणाशी जोडला गेलेला राजकीय वरदहस्त हाही गंभीर प्रश्न समोर आला आहे.

तुळजापूर ड्रग प्रकरणात आरोपी चंद्रकांत कने याने विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा प्रचार केला होता. तर ट्रक प्रकरणातील आरोपी विनोद गंगणे हे भाजपशी संबंधित आहेत. यावर खासदार ओमराजे निंबाळकर म्हणाले,'या प्रकरणाचा सगळ्यात पहिल्यापासून मी पाठपुरावा करत आहे. केवळ लोकप्रतिनिधी म्हणून हा पाठपुरावा करत नाही इथला जबाबदार नागरिक म्हणून करत आहे. आपल्या जिल्ह्याच्या तरुणांवर या ड्रगचा किती खोलवर परिणाम होतो त्याची मला जाणीव आहे. तरुण पिढी ड्रग्सच्या आहारी जाऊ नये ही माझी मानसिकता आहे. यासंदर्भात मी गृहमंत्री अमित शाह यांनाही पत्र लिहिलं आहे. यात सेंट्रल नार्कोटिक्सला ही मी पत्रव्यवहार केले आहेत. संसदेत मी हा विषय उचलला आहे. स्थानिक एसपींची मी संपर्कात आहे.

या प्रकरणात आमचा सख्खा भाऊ जरी असला किंवा कोणी जरी असेल तर त्याच्यावरही कारवाई होणारच असे ओमराजे निंबाळकर म्हणाले. व्हायरल फोटोविषयी बोलताना ते म्हणाले, मी कायम लोकांच्या संपर्कात असतो. जर कोणी माझ्यासोबत फोटो काढायला आला तर मला तुम्ही कोण आहात हे विचारणं शक्य नसतं असंही ते म्हणाले. यात भाजपशीही संबंधित कोणी असेल तरी मी त्याला पक्षाशी जोडत नाही. संबंधित आरोपीला आरोपीसारखं वागवून त्याच्यावर कारवाई करा अशी मागणी असल्याचं निंबाळकर म्हणाले. दरम्यान, सरसकट पुजाऱ्यांना बदनाम करू नका, याचा रोजच्या पुजाऱ्यांशी संबंध नसल्याचं पुजारी मंडळाचे विनित शिंदे यांचं म्हणणं आहे.

# पक्षाची कामे करायची नसतील तर निवृत्ती घ्या

## खरगेंनी जाहीर सभेत काँग्रेसी नेत्यांना खडसावले

**अहमदाबाद, दि. ९ वृत्तसंस्था**

गुजरातमध्येकाँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. य कार्यक्रमात पक्षाच्या प्रमुखांसह सर्व ज्येष्ट नेते सहभागी झाले आहेत. यावेळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पक्षाच्या सर्व नेत्यांना कडक संदेश दिला आहे. पक्षाची कामे न करणारे अथवा दिलेली जबाबदारी योग्यरित्या न पार पाडणाऱ्यांनी निवृत्ती घ्यावी, असे खरगेंनी स्पष्टपणे सांगितले.



अहमदाबाद येथे साबरमती नदीच्या काठावर काँग्रेस अधिवेशनाला संबोधित करताना खरगे म्हणाले, संघटनेच्या जडणघडणीत जिल्हाध्यक्षांची भूमिका महत्त्वाची असणार आहे. म्हणूनच त्यांची नियुक्ती एआयसीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार काटेकोरपणे आणि निष्पक्षपणे केली पाहिजे. जिल्हाध्यक्षांनी नियुक्ती झाल्यापासून एका वर्षाच्या आत सर्वोत्तम लोकांचा समावेश करुन बूथ कमिटी, मंडल कमिटी, ब्लॉक कमिटी आणि जिल्हा कमिटी तयार करावी. यामध्ये कोणताही पक्षपात नसावा, असे त्यांनी सांगितले.

खरगे पुढे म्हणतात, आम्ही देशभरातील जिल्हाध्यक्षांच्या तीन बैठकाही बोलावल्या. मी आणि राहुल गांधी यांनी त्यांच्याशी बोललो आणि त्यांचे मत जाणून घेतले. भविष्यात आम्ही निवडणुकीसाठी उमेदवार निवड प्रक्रियेत जिल्हाध्यक्षांना सहभागी करून घेणार आहोत. मला सर्वांना असेही सांगायचे आहे की, जे पक्षाच्या कामात मदत करत नाहीत, दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडत नाहीत, त्यांनी निवृत्त व्हावे.

आपण पुन्हा एकदा भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढत आहोत. स्वातंत्र्याच्या या दुसऱ्या लढाईत पुन्हा शत्रू अन्याय, असमानता, भेदभाव, गरिबी आणि सांप्रदायिकता आहेत. फरक एवढाच आहे की पूर्वी परदेशी लोक अन्याय, गरिबी आणि असमानतेला प्रोत्साहन देत होते, आता आपले स्वतःचे सरकार ते करत आहे. पूर्वी परदेशी लोक जातीयवादाचा फायदा घेत असत, आज आपलेच सरकार त्याचा फायदा घेत आहे. पण आपण ही लढाई देखील जिंकू, असा दावाही त्यांनी यावेळी केला.

**दीनानाथ रुग्णालयाच्या अडचणी वाढणार**

# महिला आयोगाकडून पोलीस आयुक्त व मेडिकल काउन्सिलला कारवाईचे आदेश

**मुंबई, दि. ९ प्रतिनिधी**

पुण्यात तनिषा भिसे या गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याची घटना मागच्या आठवड्यापासून राज्यभर चर्चेत आहे. पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर या प्रकरणी हलगर्जीपणाचा आरोप होत आहे. रुग्णालयाने भिसे कुटुंबाकडे उपचारांआधीच १० लाख रुपये इतकी अनामत रक्कम मागितली होती. अनामत रक्कम लवकर भरता आली नसल्यामुळे रुग्णालयाने उपचारांना उशीर केला आणि तनिषा भिसे दगावल्या असा आरोप केला जात आहे. या प्रकरणानंतर राज्यभरातून रुग्णालयावर टीका होऊ लागली आहे. दरम्यान, या प्रकरणाच्या चौकशीसाठी आरोग्य विभागाने नेमलेल्या समितीचा अहवाल समोर आला असून यामध्ये रुग्णालय प्रशासन दोषी



आढळलं आहे. तसेच भिसे कुटुंबाकडे अनामत रकमेची मागणी करणाऱ्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील डॉ. सुश्रुत घैसास यांनी राजीनामा दिला आहे. तर, या प्रकरणावर रुग्णालयाचे कार्यकारी संचालक डॉक्टर धनंजय केळकर म्हणाले, "त्या दिवशी कोणत्या कारणाने राहू-केतू काय डोक्यात मध्ये आला की डॉ. घैसास यांनी चौकोनात १० लाखांचं डिपॉझिट लिहिलं. ही गोष्ट खरी आहे." तनिषा भिसे यांच्या मृत्यूमुळे दीनानाथ मंगेशकर रुग्णालय चौकशीच्या फेऱ्यात अडकलेले असतानाच आता त्यांचा अडचणी अजून वाढल्या आहेत. कारण यात आता महिला आयोगानेही उडी घेतली आहे. तनिषा भिसे यांच्या मृत्यूनंतर रुग्णालयाने जी अंतर्गत चौकशी केली होती तिचा अहवाल रुग्णालयाने सार्वजनिक केला होता. मृत तनिषा आणि भिसे कुटुंबीयांची वैयक्तिक माहिती त्यांच्या परवानगीशिवाय सार्वजनिक केली. त्यामुळे मानसिक त्रास झाल्याची तक्रार सविता भिसे यांनी राज्य महिला आयोगाकडे केली होती. याची महिला आयोगाने गंभीर दखल घेतली असून पुणे पोलीस आयुक्त, महाराष्ट्र मेडिकल काउन्सिलला कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

# एनआयएकडे राहणार तहव्वुर राणाचा ताबा

**नवी दिल्ली, दि. ९ वृत्तसंस्था**

मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात मास्टमाईंड असणाऱ्या तहव्वुर राणाला आजच भारतात आणले जाण्याची शक्यता आहे. त्याबाबत मुंबई पोलिसांनी सांगितलं की २६/११ चा आरोपी तहव्वुर राणाला भारतात आणल्यानंतर त्याला ताब्यात घेण्याचा निर्णय हा प्रत्यार्पणाच्या आदेशानुसार अवलंबून असणार आहे.

तहव्वुर राणाला आज भारतात आणलं जाणार असून एनआयए त्याला ताब्यात घेणार आहे. सूत्राच्या माहितीनुसार त्याला मुंबईत आणलं जाण्याची शक्यता आहे. सुरुवातीचे काही आठवडे आरोपी एनआयएच्या ताब्यात राहणार आहे. राष्ट्रीय तपास संस्थेकडून (एनआयए) कट रचण्याच्या गुन्ह्यासंदर्भात राणाविरोधात दिल्लीत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यांशी संबंधित मुंबई पोलीस राणाला ताब्यात घेऊ शकतात की नाही, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आली नाही. प्रत्यापर्णाच्या प्रक्रियेची माहिती घेतल्यानंतर मुंबई गुन्हे शाखेकडून राणाला ताब्यात घेण्यात येणार की नाही, हे स्पष्ट होईल, असे सूत्रानं सांगितलं. राणाला चौकशीसाठी किंवा न्यायालयीन कार्यवाही मुंबईत हलवण्याबाबत मुंबई पोलिसांना अद्याप कोणताही औपचारिक संदेश मिळालेला नाही, असे सूत्रांनी सांगितले.

## कोरटकरला अखेर जामीन मंजूर

**कोल्हापूर, दि. ९ प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा अपमान करणाऱ्या तसेच इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी देणाऱ्या प्रशांत कोरटकरला जामीन मंजूर करण्यात आला आहे. प्रशांत कोरटकर पाच दिवस पोलिस कोठडीत आणि 10 दिवस न्यायालयीन कोठडीत होता. 30 मार्च रोजी कोल्हापूर कनिष्ट न्यायालयाने त्याला 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती. कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयानं त्याचा जामीन मंजूर केला.

नागपूरच्या प्रशांत कोरटकरने इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना कॉल करुन धमकी दिली होती. तसेच त्याने छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अपशब्द वापरले होते. त्यानंतर इंद्रजीत सावंत यांनी कोल्हापूरमध्ये कोरटकर विरोधात तक्रार नोंद केली होती.

या प्रकरणी प्रशांत कोरटकर एक महिन्याहून अधिक काळ फरार होता. कोल्हापूर पोलिसांनी त्याला तेलंगणामधून अटक केली. त्यानंतर कोल्हापूर सत्र न्यायालयाने त्याला आधी पाच दिवसांची पोलिस कोठडी आणि नंतर 10 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यानंतर त्याला पुन्हा 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती. आता त्याला जामीन मंजूर करण्यात आला आहे.

# डोमिनिकन रिपब्लिकमध्ये नाईटक्लबचे छत कोसळले

## 89 ठार, 160 जखमी

**सँटो डोमिंगो, दि. ९ वृत्तसंस्था**

लॅटिन अमेरिकन देश डोमिनिकन रिपब्लिकमध्ये नाईटक्लबचे छत कोसळून झालेल्या दुर्घटनेत ८९ जण ठार झाले असून, १६० जण जखमी आहेत. राजकारणी, खेळाडू आणि इतरांनी उपस्थित असलेल्या मेरेंग्यू संगीत कार्यक्रमादरम्यान ही दुर्घटना घडली. ढिगाऱ्याखाली दबलेल्या संभाव्य जिवंत लोकांना शोधण्यासाठी शोध मोहीम राबवली जात आहे.

आपत्कालीन ऑपरेशन सेंटरचे संचालक जुआन मॅन्युएल मेंडेझ यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना सॅंटो डोमिंगोमधील मजली जेट सेट नाईट क्लबमध्ये घडली.बचाव पथके ढिगाऱ्याखाली दबलेल्या संभाव्य वाचलेल्यांचा शोध घेत आहेत. नाईट क्लबचे छत कोसळल्यानंतर जवळपास १२ तास उलटूनही, बचाव पथके ढिगाऱ्याखाली दबलेल्या लोकांना जिवंत बाहेर काढत आहेत. अग्निशमन विभागाचे कर्मचारी कॉंक्रीटचे ब्लॉक काढण्याचे काम करत आहेत.

नाईट क्लबचे छत कोसळल्यानंतर, डोमिनिकन रिपब्लिकच्या प्रोफेशनल बेसबॉल लीगने क्लबवर एक पोस्ट केली आहे. यामध्ये म्हटलं आहे की, ५१ वर्षीय एमएलबी पिचर ऑक्टाव्हियो डोटेल यांचाही अपघातात मृत्यू झाला. अधिकाऱ्यांनी डोटेलला ढिगाऱ्यातून वाचवले आणि रुग्णालयात नेले, परंतु त्याला वाचवता आले नाही. लीगचे प्रवक्ते सोस्की टेरेरो यांनी दिलेल्या माहितीनुसार, डोमिनिकन बेसबॉल खेळाडू टोनी एनरिक ब्लँको कॅब्रेरा याचाही अपघातात मृत्यू



झाला. या अपघातात राष्ट्रीय आमदार ब्रे वर्गास जखमी झाले.

अपघातानंतर मेरेंग्यू गायिका रुबी पेरेझ बेपत्ता आहे. छत कोसळल्यावर त्याला वाचवण्यात आल्याचे त्याच्या नातेवाईकांनी सांगितले असले तरी, आपत्कालीन ऑपरेशन सेंटरचे संचालक मेंडेझ यांनी या माहितीला दुजोरा दिलेला नाही. पेरेझचे व्यवस्थापक एनरिक पॉलिनो म्हणाले की, संगीत कार्यक्रम मध्यरात्री सुरू झाला. यानंतर सुमारे एक तासानंतर छत कोसळले. ही घटना खूप लवकर घडली. घटनेच्या वेळी तो एका कोपऱ्यात लपला होता, त्याला वाटले की भूकंप झाला आहे.

# दीदी करेल तुमच्या मालमत्तेचे रक्षण...

## वक्फ कायद्याच्या पार्श्वभूमीवर ममता बॅनर्जींची भूमिका

**कोलकाता, दि. ९ प्रतिनिधी**

वक्फ (दुरुस्ती) कायद्यावरून पश्चिम बंगालमध्ये उसळलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मुस्लिम समुदायाच्या मालमत्तेचे रक्षण करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. "माझी मालमत्ता कोणीही घेऊ शकत नाही, तर मी दुसऱ्याची कशी घेऊ?" असा सवाल करत, "लक्षात ठेवा, दीदी तुमच्या मालमत्तेचे रक्षण करेल," असे त्यांनी ठामपणे सांगितले.

कोलकात्यातील कार्यक्रमात बोलताना बॅनर्जी म्हणाल्या, "माझ्यावर गोळ्या झाडल्या तरी, तुम्ही मला एकतेपासून वेगळं करू शकणार नाही. पश्चिम बंगालमध्ये कोणतेही धार्मिक विभाजन होणार नाही."



त्या पुढे म्हणाल्या, "आपल्याला ३० टक्के जनतेला सोबत घेऊन चालावं लागेल. काही लोक विचारतात की मी सर्व धर्मांच्या ठिकाणी का जाते, तर मी म्हणते – आयुष्यभर मी तिथेच जाणार."

८ एप्रिलपासून लागू झालेल्या वक्फ कायद्याच्या विरोधात मुर्शिदाबाद जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर निदर्शने झाली. जंगीपूर परिसरातील राष्ट्रीय महामार्ग १२ वर हजारोंच्या संख्येने नागरिकांनी उतरून कायदा मागे घेण्याची मागणी केली. आंदोलनादरम्यान दगडफेक झाली आणि काही वाहनांची जाळपोळही करण्यात आली.

सध्या या भागात परिस्थिती नियंत्रणात असून, रघुनाथगंज आणि सुती पोलिस स्टेशन हद्दीत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. तसेच, चुकीची माहिती पसरू नये म्हणून जंगीपूर परिसरात इंटरनेट सेवा तात्पुरती बंद ठेवण्यात आली आहे. पोलिस दल मोठ्या प्रमाणावर तैनात आहे.

# रोहा हादरला, 1 वर्षाच्या चिमुकल्या बालकासह आजीने संपवले जीवन

**रोहा, दि. ९ प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात पुन्हा एकदा एक धक्कादायक घटना घडली आहे. उर्मिला सिद्धीराज कोरे वय वर्षे ( ५१ ) रा . १०३ ओम चेंबर पहिलामाळा रोहा शहर येथील महिला असुन या आजीने आपल्या चिमुकल्या एक वर्षाच्या नातवंडासह बिल्डिंगच्या टेरेसवरून उडी मारल्याने आजीचा जागीच मृत्यू झाला तर नातू वेदांत विवेक भोगडे वय वर्षे ( १) याला गंभीर दुखापत झाल्याने पुढील उपचाराकरता रोहा शासकीय हलवण्यात आले होते परंतु मुलाची नाजूक परिस्थिती असल्यामुळे डॉक्टरांनी नवी मुंबई येथील एमजीएम या दवाखान्यात पुढील उपचाराकरता नेले असता तेथे त्या मुलाची प्राणज्योत मावळली या घटनेमुळे संपूर्ण परिसर हादरला असून सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मात्र आत्महत्यांचे कारण अद्याप अस्पष्ट आहे .

दरम्यान मयत उर्मिला सिद्धीराज कोरे यांना मानसिक आजार होताच परंतु वेळेवर गोळ्या औषध उपचार घेत नसल्यामुळे मानस्कर बळावर आजार



होता. बुधवारी (९ ) रोजी सकाळी साडेसात वाजताच्या पुर्वी आजीने नातु वेदांत विवेक भोगडे सोबत घेऊन ओम चेंबर बिल्डिंगच्या टेरेसवरून उडी मारली त्यामुळे आजीच्या डोक्याला गंभीर इजा झाल्यामुळे आजीचा जागीच मृत्यू झाला तर नातु वेदांत भोगडे याच्या डोक्याला जोरदार मार लागल्यामुळे त्याला रोहा शासकीय उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेले असता डॉक्टरांनी तात्काळ मुंबई येथे हलवण्यात सांगितले होते परंतु मुंबईत एमजीएम रुग्णालयात मुलाचा उपचार सुरू असता बाहेरची दुनिया बघण्या आधीच त्याची सुद्धा प्राणज्योत मावळली .

# वाड्यातील सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

## 42 ग्रामपंचायती महिलांसाठी राखीव

**वाडा, दि. ९ प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण आज तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी पंचायत समिती प्रशिक्षण सभागृहात जाहीर केले. यावेळी 42 ग्रामपंचायती या महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सन 2025 ते 2030 या काळावधीसाठी हे आरक्षण असणार आहे.वाडा तालुका हा पेसा क्षेत्रात येत असल्याने 84 ग्रामपंचायती अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत.



तालुक्यातील सांगे नाणे,गालतरे,सुपोंडे, आंबिस्ते बुद्रूक.,खानिवली, पिंपळास, आखाडा, कासघर, कळंभे,पीक, कोने, कोनसई, बालिवली, बिलघर, ऐनशेत, शेले, चिखले, कुयलू, मांगरूळ, बिलावली, मांडवा, उज्जैनी, डोंगस्ते, कुडूस, कोंढले, नारे,खुपरी, उसर, वसूरी बु.,देवघर,केळठण, देवळी, हारोसाळे, जामघर, मानिवली, बुधावली, पोशेरी, तुसे, गांधरे, सोनशिव, सारसी व ब्राम्हणगाव या ग्रामपंचायतीचे सरपंच पद हे महिलांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे.

आरक्षण सोडतीस वाडा उपविभागीय कार्यालयाचे शिरस्तेदार सुनील लहांगे,नायब तहसीलदार रनजीत शिराळकर यांच्यासह तालुक्यातील विविध ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# भिवंडीतील हॉटेलमध्ये मेलेले किडे आणि माशा सापडल्याचा व्हिडिओ व्हायरल

## खवय्यांमध्ये एकच खळबळ

**भिवंडी, दि. ९ प्रतिनिधी**

शहरातील दिवानशा दर्गा रोड येथील गोल्डन हॉटेलमध्ये चटणीमध्ये मेलेले किडे आणि माशा सापडल्याने हॉटेलमध्ये जेवण करणाऱ्या खवय्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील दिवानशहा दर्गा रोड येथील गोल्डन हॉटेलमध्ये लाल आणि हिरव्या रंगाच्या चटणीमध्ये चक्क मेलेले किडे आणि माशा असल्याचे काही ग्राहकांना दिसून आले. त्यानंतर या घटनेचा व्हिडीओ सामाजिक माध्यमांवर चांगलाच व्हायरल झाला असून यामुळे हॉटेलमधील जेवणावर ताव मारणाऱ्या खवय्यांमध्ये हॉटेलच्या पदार्थांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाला असून या घटनेनंतर ग्राहक खाद्य पदार्थ तपासूनच खाणार एवढे मात्र नक्की असेच काही स्पष्ट होत आहे. दुसरीकडे चटणीत माशा आणि किडे सापडल्याच्या घटनेनंतर भिवंडी महानगरपालिका आरोग्य विभाग येथील रात्री उशिरा पर्यंत चालणाऱ्या हॉटेल तसेच निकृष्ट दर्जाच्या देण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थ,हॉटेलवरती काय कारवाई करते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# तळा तालुक्यातील गिरणे येथे खारभूमी संशोधन केंद्र उभारणीचा मार्ग मोकळा

**तळा, दि. ९ प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील गिरणे येथे खार जमीन संशोधन केंद्र उभारणीचा मार्ग मोकळा झाला असून यासंबंधी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली खा. सुनिल तटकरे, मंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत महत्वपूर्ण बैठक पार पडली. डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या अधिपत्याखाली कार्यरत पनवेल येथील खार जमीन संशोधन केंद्राच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे बाधित झालेल्या पारगाव प्रक्षेत्राच्या जमिनीच्या मोबदल्यात तळा तालुक्यातील गिरणे गावातील ४७ हेक्टर जमीन देण्याचा



निर्णय राज्य शासनाने घेतला असून खार जमीन संशोधन केंद्र पनवेल हे खार जमिनीवर संशोधन करणारे महाराष्ट्रातील एकमेव संशोधन केंद्र आहे. समुद्रालगतच्या खारवट जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी करावयाच्या उपाययोजना आणि क्षार प्रतिकारक भात जातीच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र शासन कृषी विभागांतर्गत या कृषी संशोधन केंद्राची स्थापना सन १९४३ मध्ये करण्यात आली. सन १९५९ मध्ये कृषी संशोधन केंद्राचे नामकरण खार जमीन संशोधन केंद्र असे करण्यात आले. या संशोधन केंद्राच्या अधिपत्याखाली पनवेल येथे १२.८० हेक्टर तसेच पारगाव येथे २०.२४ हेक्टर असे एकूण 33.04 हेक्टर क्षेत्र होते. दरम्यान पारगाव क्षेत्रातील २०.२४ क्षेत्र हे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकरिता सिडकोने संपादित केले. पारगाव प्रक्षेत्राच्या जमिनीच्या मोबदल्यात खार जमीन संशोधन केंद्रास पर्यायी खार जमीन देण्याचे सिडकोने आश्वासित केले होते.खाडीलगत शेतकऱ्यांसाठी संशोधन केंद्रामार्फत विविध शिफारशी तंत्रज्ञान तसेच क्षार प्रतिकारक भात जातींची निर्मिती व बीजोत्पादन केलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने खार जमीन संरक्षणासाठी बाह्यकाठ बांधणी, पाणी निचरा व्यवस्थापन, सुधारित भात लागवड पद्धती जमिनी आहेत. विद्यापीठाची जमीन अधिग्रहीत करताना सिडकोकडून देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात येईल. विद्यापीठाला शेती, शेतीसंशोधन, शेती विस्तार, खारभूमी संशोधन केंद्रासाठी आवश्यक जमीन आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी लागणारा निधी सिडको आणि राज्य शासन देईल. यासंबंधीचा वस्तूनिष्ठ प्रस्ताव विद्यापीठाने सादर करावा, त्यावर राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असेही या बैठकीत ठरले.

# आज होणार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण

**उल्हासनगर, दि. ९ प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणाची तारीख शेवटी निश्चित करण्यात आली असून 10 एप्रिल रोजी पुतळ्याचे अनावरण करण्यात येणार असल्याची माहिती डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक समितीचे महासचिव भाई रोकडे यांनी दिली आहे.

शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या पुढाकारने उल्हासनगर कॅंप ४ येथील सुभाष टेकडी चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसवण्यासाठी एक कोटीचा निधी मंजुर करण्यात आला होता. पुतळा स्मारक समितीचे अध्यक्ष अरुण कांबळे समवेत अन्य सदस्यांनी पूर्णाकृती पुतळा बसवण्या ची मागणी केली होती . सदर ची मागणी लक्षात घेवून आमदार डॉ. किणीकर यांनी शासकीय स्तरावर धावपळ करुन सर्व मंजुरी मिळवून पुतळा स्मारका साठी निधी मंजूर करुन घेतला असुन पुतळा स्मारक तयार होऊन अनेक दिवस उलटले तरी पुतळ्याचे अनावरण होत नसल्याने स्थानिक आंबेडकरी अनुयायनी तीव्र नाराजी व्यक्त केली . तसेच खासदार डॉ . श्रीकांत शिंदे यांची वेळ मिळत नसल्याने अनावरण सोहळा लांबणी वर जात असल्याचे पाहून स्मारक समिती ने 14 एप्रिल अगोदर हा अनावरण सोहळा उरकून घेण्याचा निर्णय घेतला आहे . शेवटी आमदार किणीकर आणि महापालिका आयुक्त सौ. मनिषा आव्हाळे आणि पुतळा स्मारक समिती यांच्या पुढाकाराने 10 एप्रिल रोजी पुतळा अनावरणा ची तारीख निश्चित करण्यात आली आहे . दरम्यान पुतळ्याचे अनावरण भंते डॉ . एन आनंद महाथेरो यांच्या हस्ते होणार असून आमदार किणीकर, रिपब्लिकन नेते सुरेश सावंत , अरुण कांबळे, माजी नगरसेवक प्रमोद टाले, प्रशांत धांडे, प्रवीण खरात, दिवाकर खळे समवेत स्मारक समिती चे सर्व सदस्य उपस्थित राहणार असल्याची माहिती श्री रोकडे यांनी दिली आहे.

# डॉ. आंबेडकर जयंती निमित्त समता सप्ताह

**नवी मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 व्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत मुंबई नवी मुंबई विभागात दिनांक 8 एप्रिल 2025 ते 14 एप्रिल 2025 या कालावधीत सामाजिक सप्ताह कार्यक्रम राबवण्यात येणार असल्याचे माहिती बाळासाहेब सोळंकी प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग यांनी कोकण भवन येथे दिनांक 8 एप्रिल 2025 रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी कोकण विभागीय माहिती व जनसंपर्क सहाय्यक उपसंचालिका संजीवनी जाधव उपस्थित होत्या.

# बदलापूरमधील बेपत्ता मुलाचा शोध गुजरातमध्ये लागला

**बदलापूर, दि. ९ प्रतिनिधी**

शिकवणीला जातो असे सांगून घराबाहेर पडलेला १४ वर्षांचा मुलाचा शोध अखेर गुजरात रेल्वे स्थानकावर लागला. रेल्वे पोलिसांनी चौकशी केली असता, तो मामाकडे चालल्याचे त्याने सांगितले होते. त्यामुळे संशय आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. अभ्यासातून आलेल्या तणावामुळे तो घर सोडून निघून गेल्याची माहिती बदलापूर पश्चिम पोलिसांनी दिली आहे. हा मुलगा बेपत्ता झाल्यानंतर अनेक तर्कवितर्क लढवले जात होते. त्याचे अपहरण तर झाले नाही ना, अशीही भिती व्यक्त केली जात होती.

बदलापूर शहरात मागील आठवड्यात लहान मुलांच्या खरेदी विक्रीचा पर्दाफाश झाला आहे. लहान मुलांच्या खरेदी विक्री व्यवहाराचे संभाषण करणाऱ्या एका व्यक्तीला पोलिसांनी अटक केली होती. वन विभागातील अधिकाऱ्याच्या सतर्कतेमुळे हा भयंकर प्रकार समोर आला होता. त्याच्या काही दिवसातच हा बदलापूर पश्चिमेकडील रमेशवाडी भागात राहणारा १४ वर्षीय बेपत्ता झाल्याची बातमी समोर आली. हा मुलगा शिकवणीला जातो असे सांगून घरातून बाहेर पडला तो वेळी घरी परतलाच नाही. त्यामुळे कुटुंबियांच्या काळजाचा ठोका चुकला होता. तर बदलापुरात एकच खळबळ उडाली होती. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर बदलापूर पश्चिम पोलिस त्याचा शोध घेत होते. त्यासाठी विविध पथकांच्या माध्यमातूनत तपास सुरू होता. असे असतानाच तो गुजरातमध्ये मिळून आला.

गुजरातमधील बिल्लीमोरा या रेल्वे स्टेशनवर मुलगा सापडल्याने रेल्वे पोलिसांनी त्याच्याकडे चौकशी केली. त्यावेळी मुलाने आपण घर सोडून मामाच्या घरी चालल्याची माहिती दिली. त्यानंतर बदलापूर पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ सुत्र हलवत त्याला घरी आणण्यासाठी हालचाली सुरू केल्या. त्यानुसार त्याचे पालक गुजरातला गेले असून मुलाला घेऊन परत येत आहेत, अशी माहिती बदलापूर पश्चिम पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनिल थोरवे यांनी दिली आहे.

# अंबरनाथमध्ये शिवशाही हॉस्पिटलचे उद्घाटन

**अंबरनाथ , दि . ८ प्रतिनिधी**

अंबरनाथ पूर्वेला गॅस गोडाऊन समोर, महालक्ष्मी नगर येथे डॉ जानु मानकर यांनी सुरु केलेल्या शिवशाही हॉस्पिटलचे उद्घाटन पद्मश्री डॉ प्रकाश बाबा आमटे यांचे हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी डॉ मंदाकिनी आमटे आणि सुप्रसिद्ध गायिका पुष्पा पाकधरे उपस्थित होत्या.

अंबरनाथ मध्ये प्रथमच नुरोक्रिटिकेअर मल्टीस्पेशालीस्ट शिवशाही हॉस्पिटलचे उद्घाटन झाले. या प्रसंगी बोलताना पद्मश्री डॉ प्रकाश आमटे म्हणाले की, आम्ही चंद्रपूर सारख्या आदिवासी विभागात निरपेक्ष भावनेने कुष्ठरोगी आणि आदिवासी यांची सेवा करत आहोत . आदिवासी आणि जंगली जनावर यांच्या जीवनात फारसा फरक नसतो. ज्या ठिकाणी लाईटची सोय नव्हती, टेलिफोन नव्हते, रस्ते नव्हते अशा आदिवासी दुर्गम भागात हॉस्पिटल सुरु केले. तरुणांना प्रेरणा दिली. शाळा सुरु केली. आदिवासी मध्ये आरोग्य, शेती आणि शिक्षण या विषयी जागृती केली.या विभागात एका आदिवासी इसमावर अस्वलाने हल्ला केला होता, डोक्याची पूर्ण कवटी निघाली होती. कुठल्याही शस्त्रक्रियाचे साधन नसताना एक मोठी सुई गरम करून जवळपास शंभर टाके घातले आणि आदिवासीचे प्राण वाचविले. परंतु डोळ्यावर मोठी जखम झाल्यामुळे त्याला दिसायला कमी झाले. जंगलात अन्न गोळा करायला त्याला जमले नाही. हीस्र प्राण्यांच्या हल्यातून त्याला वाचविले परंतु तो आदिवासी इसम भुकबळीने मेला अशी सत्यकथा प्रकाश आमटे यांनी कथन केली. डॉ जानू मानकर प्रास्तविक भाषणात म्हणाले की, अंबरनाथ येथे पुरातत्व खात्याचे शिवमंदिर आहे, तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श ठेऊन हॉस्पिटलचे नाव शिवशाही ठेवले आहे . या पुढे अंबरनाथच्या कुठल्याही पेशन्टला बाहेर जावे लागणार नाही. मुख्यमंत्री सहायता निधी, महात्मा फुले जनआरोग्य सेवेचा लाभ शिवशाही हॉस्पिटल मध्ये मिळेल. डिपॉझिट साठी कुणाचीही अडवणूक होणार नाही याची मी ग्वाही देतो असेही डॉ मानकर म्हणाले.

या प्रसंगी अंबरनाथचे प्रसिद्ध डॉक्टर एस व्ही देशपांडे, डॉ गणेश राठोड (कोविड योद्धा ), डॉ मुंदडा सर, डॉ नरेंद्र शेट्टी (त्वचा रोग तज्ञ ) डॉ विजय पिल्ले (हृदयरोग तज्ञ) डॉ हरीश लॅपसिया (बालरोग तज्ञ ) यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ अविनाश गव्हाणे (स्त्री रोग तज्ञ )यतीन भिसे (नेत्ररोग तज्ञ ) चंद्रकांत साळवे (बालरोग तज्ञ ) डॉ सुजाता मानकामे, डॉ उषा माहेश्वरी, डॉ प्रमोद बेलापुरे, डॉ संदीप साठे, डॉ राहुल चौधरी, डॉ प्रतीक्षा गायकवाड आदींना डॉ प्रकाश आमटे, डॉ मंदाकिनी आमटे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला अंबरनाथचे सुप्रसिद्ध उद्योगपती विश्वानाथ पनवेलकर, मा. नगराध्यक्षा मनीषा वाळेकर, मा. नगरसेवक सुभाष साळुंखे, आंबेडकरी चळवळीतील नेते राहुल हंडोरे,आर पी आय चे ठाणे प्रदेश महासचिव श्याम शेवाळे, मंत्रालयातील माजी उपसचिव कैलास भांडलकर, डॉ प्रदीप पवार आदी विविध सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सुप्रसिद्ध कलाकार जुनियर मकरंद अनासपुरे यांनी मनोरंजनाचा कार्यक्रम सादर केला.

# 54 गाव- वाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठ्याचा तर 44 गाववाड्यांसाठी विंधन विहिरींचा प्रस्ताव

**पनवेल, दि. ९ : प्रतिनिधी**

मार्च महिना संपला असून एप्रिल महिन्याला सुरुवात झाली आहे. त्यामुळे कडक उन्हाळा जाणवू लागला आहे. पनवेल पंचायत समितीतर्फे संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा 2024-2025 उपाययोजना तयार करण्यात आला असून 54 गाव-वाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव बनवण्यात आला आहे. यासाठी 91 लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

शिरढोण, कसळखंड, आपटा, वारदोली, मालडुंगे, वाजे, खैरवाडी, नानोशी, पाले बुद्रुक, नांदगाव, गुळसुंदे, वांगणी तर्फे वाजे, बारवई या ग्रामपंचायत हद्दीतील गाववाड्यांवर पाणीपुरवठा करण्यासाठी प्रस्ताव बनवण्यात आला. तर 44 गाववाड्यांसाठी विंधन विहिरींचा प्रस्ताव बनवण्यात आला असून त्यासाठी 49 लाखांचा खर्च अपेक्षित आहे. यापैकी शिरढोण, कसळखंड, वारदोली, मालडुंगे, खैरवाडी, सोमटणे, पोयंजे, खानाव, गुळसुंदे, नांदगाव, वांगणी तर्फे वाजे, नानोशी, शिरवली, नेरे, वलप, वाकडी, भाताण, उसर्ली खुर्द या ग्रामपंचायत हद्दीमध्ये विंधन विहिरींसाठीचा प्रस्ताव बनवण्यात आला आहे.

मार्च महिन्यापासूनच उन्हाच्या झळा सुरू झाल्या आहेत. ठिकठिकाणी पाणी टंचाई जाणवू लागली आहे. पंचायत समितीच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून पनवेल तालुक्यातील संभाव्य टंचाईग्रस्त गावांच्या यादीसोबतच या टंचाईवर मात करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याचे काम पूर्ण झाले आहे. आणखी पाणी टंचाई तीव्र होण्यापूर्वी गाववाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करावा आणि विंधन विहिरी मंजूर करून त्या खोदण्याची मागणी केली जात आहे.

## उरण विधानसभेत शिवसेनेचा झंझावात

# असंख्य कार्यकर्त्यांचा शिवसेनेत पक्ष प्रवेश

**उरण, दि. ९ : प्रतिनिधी**

हिंदूहदयसम्राट शिवसेना प्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा घेऊन शिवसेना पक्षाचे नेते श्री एकनाथ शिंदे उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या नेतृत्वात संपूर्ण महाराष्ट्रात शिवसेनेचा झंझावत सुरू आहे. उरण विधानसभेत सुध्दा मावळ लोकसभेचे विद्यमान खासदार श्री. श्रीरंग आप्पा बारणे यांच्या मार्गदर्शना खाली उरण विधानसभेचे नवनिर्वाचित जिल्हा प्रमुख अतुलशेठ भगत आणि तालुका प्रमुख दिपक ठाकूर यांच्या नेतृत्वात उरण विधानसभा मतदार संघात विविध विभागात पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. राष्ट्रवादी पक्षाचे शरद पवार गट मच्छीमार सेल महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष मनोहर ठाकूर, ॲड.योगेश बापर्डीकर उरण,सुनील भोईर (माजी तालुका अध्यक्ष मनसे ),महेश पाटील( शाखा प्रमुख केगाव दांडा ), रवींद्र म्हात्रे( माजी ग्रा. पं. सदस्य चाणजे ), प्रदीप मयेकर (जेष्ठ शिवसैनिक बोरी उरण)यांच्या समवेत पनवेल तालुक्यातील समाधान परदेशी, रोहीत वैराळे,जिगर परदेशी, अमोल लांडगे,चाणक्य, परशुराम कांबळे,सचिन दिपके,राम गवळी,रवी गवळी, निलेश आंबोरे, आलंतमश तुपके,वसिम शेख,गणेश कांबळे आदी असंख्य इतर पक्षाच्या अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी पक्ष प्रमुख तथा उप मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत प्रवेश केला. तसेच गौरव गायकवाड यांची उपतालुका प्रमुख पनवेल आणि जसखार गाव शिवसेना शाखा प्रमुख पदी मेघनाथ ठाकूर व हर्षल ठाकूर यांची युवा सेना शाखा अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. नवनिर्वाचित जिल्हा प्रमुख अतुल भगत आणि तालुका प्रमुख दिपक ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उरण विधानसभेत येणाऱ्या काही दिवसात असे अनेक इतर पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांचे पक्ष प्रवेश होतील असे त्यांच्या वतीने सांगण्यात आले.सदर पक्ष प्रवेश कार्यक्रमावेळी युवा सेना सरचिटणीस रुपेश पाटील,उप जिल्हा प्रमुख विनोद साबळे,पनवेल तालुका प्रमुख रघुनाथ पाटील,महिला जिल्हा अध्यक्षा मेघा ताई दमडे,रायगड जिल्हा संपर्क प्रमुख रमेश म्हात्रे,विभाग प्रमुख अक्षय घरत, गणेश घरत तसेच उरण विधानसभेचे पदाधिकारी उपस्थित होते.तदनंतर सर्व उरण विधानसभेच्या समस्त पदाधिकाऱ्यांनी कर्जत विधानसभेचे विद्यमान आमदार श्री महेंद्र थोरवे यांना वाढदिवसानिमित्त त्यांच्या निवासस्थानी जाऊन उरण विधानसभेच्या वतीने त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच उरण विधानसभेतील पक्ष प्रवेश शिवसेना सदस्य नोंदणी व तालुक्यातील बेरोजगारांसाठी मेळावा आयोजित करणे अशा अनेक विषयांवर यशस्वी चर्चा करण्यात आली. त्याच बरोबर मा. आमदार साहेबांनी पुढील वाटचालीसाठी जिल्हा प्रमुख व तालुका प्रमुख यांना शुभेच्छा दिल्या.

# आ. प्रशांत ठाकूर यांचा आत्मदहनाचा इशाऱ्यामुळे आदिवासीच्या घरांवरील कारवाई स्थगित

**पनवेल, दि. ९ : प्रतिनिधी**

आदिवासींच्या घरासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी रखरखत्या उन्हात ठिय्या आंदोलन करत आदिवासी बांधवांच्या घरावर कारवाई कराल तर मी स्वतःला या ठिकाणी पेटवून घेईन अशा शब्दात आक्रमक भूमिका घेत थेट आत्मदहनाचा इशारा सिडकोला दिला. त्यामुळे सिडकोने एक पाऊल मागे येत पनवेल उरणमधील सिडको परिक्षेत्रातील आदिवासींच्या घरे वस्त्यांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचे आश्वासन सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिले. तसेच जो पर्यंत आदिवासींच्या घरांबाबत ठोस आणि सकारात्मक निर्णय होत नाही ती पर्यंत कोणतीही कार्यवाही करायची नाही अशी रोखठोक भूमिका आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी मांडली असता त्याला सिडकोकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला. त्यामुळे कारवाईसाठी आलेल्या सिडकोच्या पथकाला रिकाम्या हाती माघारी जावे लागले असून यामुळे पनवेल उरण मधील सिडको परिक्षेत्रातील आदिवासी बांधवाना मोठा दिलासा मिळाला.

करंजाडे जवळील आणि वडघर ग्रामपंचायतीच्या हद्दीतील फणसवाडी येथील आदिवासींच्या घरावर तोडक कारवाईसाठी सिडकोचे अधिकारी, जेसीबी व तत्सम मशिनरी, अग्निशमन दल, पोलिसांचा फौजफाटा मोठ्या प्रमाणात आल्याचे समजताच आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्या ठिकाणी धाव घेत आदिवासी बांधवाना धीर दिला. उन्हाच्या कहरात ते जमिनीवर ठिय्या मांडून बसले. जोपर्यंत आदिवासी बांधवांच्या घरासंदर्भात



पुनर्वसनाची योग्य कार्यवाही होत नाही तो पर्यंत हे आंदोलन सुरूच ठेवण्याचा एल्गार त्यांनी पुकारला. जशी वेळ होत होती तसा उन्हाचा कहर वाढत होता. सकाळी ९ वाजल्यापासून या आंदोलनाने धार धरली होती. दुपारचे साडेबारा वाजता सूर्य आग ओतत होता मात्र आंदोलक आमदार प्रशांत ठाकूर व इतर आंदोलक जागेवरून हलले नाही. त्यांनी कारवाईला प्रखर विरोध केला. दरम्यान या संदर्भात सिडकोने चर्चेसाठी आमंत्रित केले. त्यानंतर आमदार प्रशांत ठाकूर यांनी आंदोलनस्थळी उपस्थितांना मार्गदर्शन करता सांगितले की, आदरणीय दि. बा.पाटील साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे चर्चेची दारे कधीही बंद करायची नाही चर्चेतून पदरात पडेल ते घेत संपूर्ण न्याय मिळेपर्यंत त्याचा पाठपुरावा करतच रहायचा आहे. वडघर ग्रामपंचायतीच्या हद्दीत फणसवाडीतील ही ३२ घरे १९८० पासून आहेत. या वाडीत इंदिरा आवास अंतर्गत घरे बांधण्यात आली. तसेच साडेबारा टक्केचे प्लॉट येथे टाकले होते मात्र आदिवासी वाडी असल्याने ते रद्द करण्यात आले. मग आता विमानतळ मार्गाला आणखी एक पर्यायी रस्ता म्हणून हा घाट घातला जात आहे. आदिवासी बांधवांच्या घरांवर बुलडोझर फिरवाल तर आम्हाला कदापीही मान्य नाही. या घरांचे योग्य पुनर्वसन व्हावे किंवा या घरांवर कोणतीच कारवाई नको अशी आमची आग्रही मागणी आहे. न्याय मिळेपर्यंत आज, उद्या आणि पुढच्या काळातही आमचे आंदोलन या ठिकाणी सुरूच राहणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधोरेखीत करून दिबासाहेबांच्या तत्त्वानुसार चर्चेला जात आहे. पण येथून मी गेल्यानंतर या घरांवर कारवाई कराल तर मी स्वतः या ठिकाणी पेटून घेईन, अशी आक्रमक भूमिका घेत सिडकोला सज्जड दम वजा इशारा दिला.

बेलापूर येथील सिडकोच्या कार्यालयात आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांची सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सह व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजा दयानिधी, सह व्यवस्थापकीय गणेश देशमुख यांच्यासोबत दीर्घ वेळ बैठक झाली.

# महादेव मंदिर यात्रेकरूंना शुद्ध पिण्याच्या पाण्याची मोफत सोय रोहा भाजपाचा उपक्रम

**रोहा, दि. ९ : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध यात्रा शिवशंभू महादेवाची यात्रा म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ख्याती आहे . या यात्रेत पार्वती महादेवाचे लग्न सोहळ्यासाठी लाखो भावीक येत असतात अशा भाविकांसाठी व यात्रेकरू साठी रोहा तालुका भाजपाच्या वतीने दोन दिवस पाणपोई चे यशस्वीरित्या नियोजन करून भाविकांची सोय केली होती . गेली बारा वर्षे भाजपाचे अमित घाग त्यांचे समाजसेवक म्हणून पाणपोईच्या माध्यमातून जनतेची सेवा करत आहेत . अशा समाज उपयुक्त उपक्रमाबद्दल अनेक भाविकांनी प्रतिक्रिया दिलेल्या आहेत .

भाजपाच्या सेवा समर्पण या विचार सरणीवर रोहा भाजपा काम करित आहे. या पाणपोई ला रोहा तालुक्यातील विविध राजकीय, सामाजिक,कला, क्रिडा, सांस्कृतिक शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवरांची भेट दिली तर पाणपोई चे यशस्वी नियोजन करण्यासाठी रोहा तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे , जिल्हा चिटणीस नरेश कोकरे , महिला जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर, रोहा तालुका कोषाध्यक्ष राजेश डाके , रोहा तालुका कामगार आघाडी सेल अध्यक्ष विलास डाके , सोशल मीडिया संयोजक सनील इंगावले, रोहा शहर अध्यक्ष युवा मोर्चा निलेश धुमाळ , परशुराम माने, संकेत मोरे , धिरज मोंडे , विकास बामणे , हृषीकेश माने यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अथक परिश्रम घेतले.

# 16 ठेका अभियंत्यांना नियमबाह्य बढती; विरोधानंतरही प्रशासनाची कार्यवाही नाही

**वसई, दि. ९ : प्रतिनिधी**

'कार्यकारी अभियंता आणि कनिष्ठ अभियंता यांच्यामध्ये केवळ एक दुवा असावा म्हणून 'शाखा अभियंता' हे पद निर्माण केले गेलेले आहे. पण, त्यांना ठोक मानधनावर घेण्याबाबत अद्याप तरी प्रस्ताव नाही. त्याकेवळ महापालिकेबाहेर घडणाऱ्या चर्चा आहेत. अशा पद्धतीचा प्रस्ताव तयार करायचा झाल्यास इतरांवर अन्याय होणार नाही, याची काळजी महापालिकेला घ्यावी लागणार आहे. यासाठी येणाऱ्या आस्थापना खर्चाचा आपल्याला आढावा घ्यावा लागेल. अभियंत्यांची ज्येष्ठता आणि अनुभव विचारात घ्यावा लागेल. त्यानंतरच अशा पद्धतीचा निर्णय फार तर घेता येऊ शकेल,' असा खुलासा वसई-विरार महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी केला आहे.

बांधकाम व पाणीपुरवठा विभागातील तब्बल 16 कनिष्ठ अभियंत्यांना प्रशासकीय व तांत्रिक कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने प्रभारी शाखा अभियंता (ठेका) पदी बढती देण्यात आलेली आहे. आस्थापना विभागाने 13 ऑगस्ट 2024 रोजी तशा आशयाचे आदेश काढून या सर्व अभियंत्यांची नियुक्ती प्रभागनिहाय बांधकाम व पाणीपुरवठा विभागात केलेली आहे. मात्र, वसई-विरार महापालिकेत शाखा अभियंता पदासाठी नियमानुसार कायद्यात कोणतीही तरतूद नसताना अनेक अभियंत्यांना दिलेल्या या बढतीला प्रचंड विरोध होत आहे. त्यात आता या 16 अभियंत्यांनी महापालिका आस्थापनेत ठोक मानधनावर घेण्यात यावे, यासाठी पालकमंत्र्यांचे उंबरठे झिजवण्यास सुरुवात केल्याची माहिती प्राप्त झालेली आहे.

त्याआधी त्यांनी विद्यमान भाजपच्या वसईच्या आमदार स्नेहाताई पंडित-दुबे व नालासोपारा विधानसभेचे आमदार राजन नाईक यांची भेट घेतली होती. परंतु या दोन्ही आमदारांनी या नियमबाह्य नियुक्तीला नकार दिलेला आहे. त्यामुळे महापालिकेतीलच एका वरिष्ठ अधिकाऱ्याने त्यांना पालकमंत्री गणेश नाईक यांची भेट घेण्याचा सल्ला दिलेला आहे. भाजप आमदारांनी अभियंत्यांच्या नियुक्तीला विरोध दर्शवला असला तरी महापालिकेने 'शाखा अभियंता' पदीची नियुक्ती रद्द केलेली नाही. या नियुक्तीमुळे अन्य अभियंत्यांच्या कामात हस्तक्षेप व स्वाक्षरी करण्याचे अधिकार त्यांना प्राप्त झालेले आहे. त्यामुळे आस्थापना विभाग व या 16 अभियंत्यांविरोधात मबापालिका कर्मचाऱ्यांत रोष आहे. या पार्श्वभूमीवर शाखा अभियंता हे केवळ कनिष्ठ अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांच्यातील दुवा आहेत. पण, या अभियंत्यांना ठोकमानधनावर घेण्याबाबत वसई-विरार महापालिकेचा कोणताच प्रस्ताव नसल्याचे आयुक्त अनिलकुमार पवार यांनी म्हटले आहे.

दरम्यान, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केवळ या अभियंत्यांकडून होणाऱ्या आर्थिक लाभाकरता त्यांची बढती या पदावर केल्याचे आरोप झालेले आहेत. या नियुक्तीकरता प्रत्येक अभियंत्याकडून अंदाजित 50 हजार ते लाख रुपये घेतले गेल्याच्याही वावड्या आहेत. या बढतीदरम्यान शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव आणि ज्येष्ठता याबाबत कोणतेही निकष पाळण्यात आलेले नाहीत. उलट राजकीय नेते व पालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आत्यंतिक जवळच्या-खास मर्जीतील, त्यांना लाभ मिळवून देऊ शकतील, अशा अभियंत्यांनाच यापदावर बढती देण्यात आल्याचेही निरीक्षण अनेकांनी नोंदवलेले आहे. यातील काही अभियंत्यांकडे तीन ते चार प्रभागांचा कार्यभार सोपविण्यामागील गौडबंगालही उकललेले नाही. या अभियंत्यांची महापालिकेतील प्रतिमा ही 'फिक्सर' अशी आहे. अनेक कामांत कर्तव्यात कसूर करून दलालांचीच भूमिका वटवत असल्याने या अभियंत्यांच्या कामावर याआधीही हरकती घेण्यात आलेल्या आहेत.

> वसई-विरार महापालिकेने ठेकेदाराला कनिष्ठ अभियंता पुरविण्याचा ठेका दिलेला आहे. शाखा अभियंता पुरविण्याकरताचा हा ठेका नाही. असे असतानाही पालिकेने कोणत्या नियमात या 16 अभियंत्यांना शाखा अभियंता पदी नियुक्ती दिली आहे? याचा खुलासा करावा. पालिका या अभियंत्यांना वेतनही कनिष्ठ अभियंता म्हणून देते आहे. यावरूनच शाखा अभियंता पदीची नियुक्ती नियमबाह्य असल्याचे स्पष्ट होते. लोकप्रतिनिधी म्हणून आमचा या नियमबाह्य नियुक्तीला विरोध आहे.
>
> **- महेश कदम, शहर मंडळ सरचिटणीस, भाजप, विरार शहर**
>
> वसई-विरार महापालिकेतील सर्वच कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत आयुक्तांनी धोरणात्मक निर्णय घेणे कमप्राप्त होते. परंतु तसे न करता केवळ काही अधिकाऱ्यांच्या मर्जीतल्या आणि आर्थिक फायदा करून देऊ शकतील, अशाच कर्मचाऱ्यांचा विचार केला गेलेला आहे. अशा पद्धतीची नियुक्ती खरे तर लोकाभिमुख नाही. किंवा व्यक्तिश: त्या अभियंत्यांची शैक्षणिक किंवा अनुभवी उन्नती साधेल, अशी नाही. किंबहुना अन्य कर्मचाऱ्यांच्या तुलनेत त्यांना आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना आर्थिक लाभ करून देणारी आहे. काही राजकीय नेत्यांच्या पालिकेत अभियंता म्हणून रुजू असलेल्या मुलांचा फायदा करून देणारी आहे. त्यामुळे ही नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात यावी.
>
> **- तसनीफ शेख, सरचिटणीस, अल्पसंख्याक मोर्चा, भाजप**
>
> महापालिकेचे अधिकारी-कर्मचारी यांची बांधिलकी सर्वसामान्य जनतेशी असायला हवी. ते जर ठराविक लोकांच्या फायद्यासाठी काम करणार असतील, तर ती जनतेवर अन्याय करणारी बाब आहे. किंबहुना महापालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्वत:ही कुणाच्या दावणीला बांधून घेणे उचित नाही. पण, वसई-विरार महापालिकेत हे पूर्वीपासूनच घडत आलेले आहे. त्यामागे तत्कालिन सत्ताधाऱ्यांची अधिकारी-कर्मचारी यांना असलेली भीतीही कारणीभूत आहे. शिवाय, कोणत्याही राजकीय पक्षाने आपल्या व्यवसायासाठी व कुटुंबीयांसाठी महापालिकेचा नियमबाह्य वापर करणे हेदेखील चुकीचे आहे. मुळात जे नियमातच नाही; तो निर्णय पालिकेने घेणेच चुकीचे आहे.
>
> **- सुदेश चौधरी, तालुकाप्रमुख, शिवसेना (शिंदे गट)**
>
> वसई-विरार महापालिकेला शाखा अभियंत्यांची नियुक्ती करायचीच होती, तर महापालिकेने तशी मागणी शासनाकडे करणे अभिप्रेत होते. ठेकेदार नियुक्त अभियंत्यांना शाखा अभियंतापदी नियुक्ती देण्याचा अधिकार महापालिकेला नाही. या नियुक्तीत महापालिकेने कोणतेही निकष पाळलेले नाहीत. किंबहुना; या निर्णयातून महापालिकेतील अन्य कर्मचाऱ्यांवर अन्याय केलेला आहे. महापालिकेचा निर्णय हा सर्व कर्मचाऱ्यांकरता समान असायला हवा. मागील 25 वर्षे महापालिकेत सेवा दिलेल्या अभियंत्यांना वगळून नव्याने आलेल्या अभियंत्यांना महापालिका अशा पद्धतीने बढती देणार असेल तर ते अत्यंत चुकीचे आहे.
>
> **- मनोज बारोट, उपजिल्हाध्यक्ष, भाजप**

## वसईतील गोदामात खैराचे ओंडके; वन विभाग पथकाची कारवाई

**वसई, दि. ९ : प्रतिनिधी**

वसई तालुक्यातील महामार्गा लगतच्या पेल्हार येथील रिचर्ड कंपाऊंड मधील गोदामात वनविभागाच्या पथकाने केलेल्या संयुक्त कारवाईत 360 खैराचे ओंडके जप्त करण्यात आले आहेत. रिचर्ड कंपाऊंडमधील गोदामात खैराच्या लाकडाचा साठा असल्याच्या गोपनीय माहितीच्या आधारे वनविभागाच्या पथकाकडून संयुक्त कारवाई करून खैराचा साठा जप्त करण्यात आला आहे.याप्रकरणी गोदाम मालकाविरोधात भारतीय वन अधिनियमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसई तालुक्यातील महामार्गा लगतच्या पेल्हार येथील रिचर्ड कंपाऊंड मधील गोदामात खैराच्या लाकडाचा साठा असल्याची गोपनीय माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती.उपलब्ध माहिती नुसार वनविभागाच्या विविध पथकांनी केलेल्या संयुक्त कारवाईत रिचर्ड कंपाउंडमधील एका गोदामात मौल्यवान प्रजाती असलेल्या खैराच्या ओंडक्यांचा मोठा साठा आढळून आला. बेकायदेशीर तस्करीच्या माध्यमातून आणलेल्या खैराच्या ओंडक्यांची गोदामात साठवणूक केली होती.साठवणूक केलेल्या खैराच्या ओंडक्यांचा गाभा काढण्याचे कामाठी पूर्ण झाले होते.गोदामातुन ३६० खैराचे ओंडके जप्त करण्यात आले आहेत. याप्रकरणी गोदाम मालका विरोधात भारतीय वन अधिनियम १९२७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मौल्यवान वनसंपत्तीच्या सुरक्षेसाठी वनविभागाने केलेल्या धडक कारवाईचे कौतुक केले जात आहे.वनविभागाने मौल्यवान झाडांची कत्तल आणि तस्करी रोखण्यासाठी कठोर पावले उचलल्यामुळे खैर तस्करांचे धाबे दनाणले आहे. जव्हार उपविभागाचे उपवनसंरक्षक डॉ सैपून शेख, डहाणू उपविभागाचे उपवनसंरक्षक निरंजन दिवाकर आणि विभागीय वनअधिकारी राठोड यांच्या मार्गदर्शनात मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे विशेष मोहीम राबवून कारवाई करण्यात आली. संयुक्त कारवाईत मांडवीचे उपविभागीय वनअधिकारी,वाडा दक्षता पथकाचे वनपरिक्षेत्र अधिकारी,वनपरिक्षेत्र अधिकारी मांडवी, गस्तपथक, भालिवली, वनपाल माजिवली, वनपाल वसई, वनपाल सातिवली, वनपाल विरार, वनपाल शिरवली आणि वनरक्षकांनी कारवाईत भाग घेतला होता.

## वसईत यांत्रिक पद्धतीने नालेसफाईला सुरुवात; 24 कोटींची तरतूद

**वसई, दि. ९ : प्रतिनिधी**

वसई विरार शहरात नालेसफाईला शुक्रवारपासून सुरवात करण्यात आली आहे. यांत्रिक पद्धत वापरून ही सफाई पावसाळ्या आधीच पूर्ण केली जाणार आहे.यासाठी २४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पावसाळ्यापूर्वी शहरतील नाल्यांची साफसफाई करण्यात येत असते. शहरात १ लाख ५० हजार ५९० मीटर लांबीचे २०१ नाले आहेत. बेकायदा बांधकामे, माती भराव, विकासाच्या नावाखाली बुजविण्यात आलेले नैसर्गिक नाले कचरा, गाळ, माती ढिगारे यामुळे नाले तुंबून गेले आहेत. याशिवाय नाले तुंबून गेल्याने पाणी जाण्यास ही अडचणी येत आहेत तर दुसरीकडे डासांचा प्रादुर्भाव याशिवाय दुर्गंधीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. यामुळे मागील काही वर्षांपासून वसई विरारकरांना पूरस्थितीच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहेत.

तासभर जरी पाऊस झाला तरीही सखल भागात पाणी जमत असते. त्यामुळे महापालिकेने यंदा एप्रिल महिन्यातच नालेसफाईच्या कामाला सुरवात करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार ९ प्रभागात एकाच वेळी नालेसफाईचे काम



हाती घेण्यात आले आहे. २०२४ मध्ये देखील महापालिकेने एप्रिल महिन्याच्या मध्यात नालेसफाईला सुरवात केली होती.

यंदा महापालिकेने नालेखोदाई व पूरप्रतिबंधक कामे यासाठी २४ कोटी रुपयांची स्वतंत्र तरतूद केली आहे. पावसाळा सुरू होण्या आधीच शहरातील सर्व नाल्यातील गाळ उपसा करून स्वच्छ केले करण्यात येणार आहेत. जेणेकरून पावसाच्या पाण्याचा जलदगतीने निचरा होण्यास मदत होईल असे पालिकेने उपायुक्त नानासाहेब कामठे (घनकचरा) यांनी सांगितले.

नालेसफाई करताना ज्याठिकाणी पोकलेन यंत्र किंवा जेसीबी पोहचू शकत नाही, अशा ठिकाणी पाण्यातून किंवा दलदलीच्या भागातून गाळ काढण्यासाठी महापालिकेने ड्रेन मास्टर या आधुनिक यंत्राचा वापर सुरू केला आहे. काही नाले हे वनविभागाच्या अखत्यारीत येतात. त्यासाठी वनविभागाची परवानगी लागणार असल्याने महापालिकेने वनविभागाची पत्रव्यवहार केला आहे. दैनंदिन नालेसाफाईच्या कामावर प्रत्येक प्रभागनिहाय उपअभियंता, सहाय्यक आयुक्त, उपायुक्त आणि अतिरिक्त आयुक्तांमार्फेत पर्यवेक्षण केले जाणार आहे. प्रत्येक अधिकाऱ्यांना देखरेखीसाठी नाले विभागून देण्यात आले आहे. या नियोजनामुळे नालेसफाई योग्यरित्या केली जाईल असा विश्वास महापालिकेने व्यक्त केला.

शहरात सुरू असलेल्या नालेसफाईचे काम योग्य पध्दतीने आणि परिणाकारकरित्या व्हावे यासाठी त्यावर अधिकाऱ्यांमार्पत पर्यवेक्षण केले जाणार आहे. शहरातील ९ प्रभागातील नाल्यांवर सहाय्यक आयुक्त, उपायुक्त आणि अतिरिक्त आयुक्त दर आठवड्याला पर्यवेक्षण करणार आहे. नाल्यातील काढलेला गाळ टाकण्यासाठी जागा देखील निश्चित करण्यात आल्या आहेत. वसई विरार शहरात १८० किलोमीटर लांबीचे दिडशेहून अधिक नाले आहेत. सर्वाधिक नाले जी- वालीव (५१) आणि एफ- पेल्हार (४३) प्रभागात आहेत.

# दिवाळीपर्यंत मीरा-भाईंदर वासीयांची तहान भागेल

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची ग्वाही

**भाईंदर, दि. ९ : प्रतिनिधी**

मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रासाठी राबवण्यात येणारी " सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना " येत्या सहा महिन्यात पुर्ण होत असून, दिवाळीपर्यंत या योजनेतून मीरा -भाईंदर महापालिका क्षेत्रातील रहिवाशांना २४ तास पाणी पुरवठा होईल, असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला आहे. बुधवारी या योजनेच्या पाहणी दौऱ्याच्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे अभियंता व इतर अधिकारी उपस्थित होते.

मीरा -भाईंदर महापालिका क्षेत्रासाठी २१८ दशलक्ष लिटर प्रति दिन पाणी पुरवठा करणारी सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना गेली ५ वर्षे रखडली होती. परंतु सातत्याने पाठपुरावा केल्याने या योजनेचे तांत्रिक काम जवळजवळ पूर्ण झाले असून उर्वरित ३० टक्के काम येत्या ६ महिन्यात पूर्ण होईल असे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले असून मीरा-भाईंदर



महापालिका वासियांना शुद्ध, २४ तास पिण्याचे पाणी या योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे.

दरम्यान वसई काशिद कोपर ते चेने जलकुंभापर्यंत सुमारे ५ किलोमीटर लांबीच्या जलवाहिनीचे काम ,वसई खाडी छेदून मायक्रो टनलिंगद्वारे जलवाहिनी टाकण्याचे काम, कवडास येथील उच्च दाब विद्युत वाहिनीचे काम, चेने वनविभागाच्या हद्दीतील जलवाहिनी, चेने येथील खासगी जागेतील पुलाचे काम ,चेने येथील जलकुंभांचे कामं या सर्व रखडलेल्या कामाचा आढावा घेऊन मंत्री सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना उपरोक्त कामे तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या आहेत .

यापूर्वी वसई -विरार महापालिकेला सूर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत १७० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणीपुरवठा सुरळीत सुरू असून पालघर जिल्ह्यातील ४४ गावांना देखील या योजनेतून पाणीपुरवठा केला जातो.तथापि, गेली काही वर्ष रेंगाळलेल्या या प्रकल्पामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील लोकांच्यासाठी अत्यंत जिव्हाळ्याचा बनला आहे. लवकरात लवकर हा प्रकल्प पूर्ण करून मीरा+भाईंदर वासीयांना २४ तास शुध्द पेयजल पुरवठा करण्याचे अभिवचन पुर्ण करण्याचा आपला मानस आहे, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

## डाकिवली-केळवण रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे



**वाडा, दि. ९ : प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील वर्दळीचा असणारा डाकिवली-केळठण या रस्त्याचे काम सुरू असून या कामात नियमानुसार साहित्य वापरले जात नसल्याने रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप शिवसेना( शिंदे गटाचे) उपजिल्हाप्रमुख सुनील पाटील यांनी केला आहे. या रस्त्याचे काम बोगस ठेकेदारावर व त्याला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी एका निवेदनाद्वारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात आली आहे.

डाकीवली-केळठण हा 12 किलोमीटर लांबीचा रस्ता असून त्यासाठी भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे यांच्या माध्यमातून साडेचार कोटीचा निधी मंजूर झाला असून हे काम ओवी कंट्रक्शन या ठेकेदार कंपनीला देण्यात आले आहे. परंतु ठेकेदार एजन्सीने हे काम निकृष्ट दर्जाचे सुरु असून गुणवत्तेचीही तडजोड करून काम करीत असून सदर कामात अधिकारी ठेकेदाराला पाठीशी घालत असल्याचा आरोप करून या कामाची सखोल चौकशी करून अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी सुनील पाटील यांनी केली आहे.

> सद्यस्थितीत काम बंद असून येत्या दोन दिवसात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारांच्या निगरालेखाली अंदाजपत्रकाप्रमाणे काम सुरू होईल.
>
> **- संजय डोंगरे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग वाडा**

# महापालिकेच्या आचोळे मल्टी स्पेशालिटी रुग्णालयाचा तिढा सुटला

## जागा महालिकेकडे हस्तांतरित करण्याचे कोकण आयुक्तांचे निर्देश

**वसई, दि. ९ : प्रतिनिधी**

नलासोपारा आचोळे येथील प्रस्तावित मल्टी स्पेशालिटी रुग्णालय जागेचे हस्तांतरण न झाल्याने तसेच विविध कारणांमुळे तीनवेळा भूमीपूजनही होऊन रख़डले होते. आमदार राजन नाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष वेधल्यानंतर फडणवीस यांनी कोकण आयुक्तांना निर्देश दिले होते. त्यानुसार कोकण आयुक्तांच्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांना यारुग्णालयाची जागा हस्तांतरीत करण्याचे आदेश निघाल्याने आचोळे मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटलचा मार्ग मोकळा झाला आहे.

वसई, विरार शहरांमधील नागरिकांसाठी सर्वाधिक खाटांची क्षमता, सुसज्ज अशा सोयीसुविधा असलेले रुग्णालय उभारण्यात यावे, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. त्यानुसार महापालिकेने प्रभाग समिती 'ड'मधील आचोळे येथील दोन एकर जागेत २०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, विविध प्रकारच्या अडचणींमुळे रुग्णालयाचे काम पुढे सरकले नव्हते. हा प्रश्न मार्गी लागावा यासाठी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनीसुद्धा शासन दरबारी पाठपुरावा केला होता.

त्यानंतर ८ जुलै २०२४ रोजी शासनाच्या नगरविकास विभागाने महापालिका क्षेत्रातील रुग्णालय व मूलभूत सुविधेसाठी २५० कोटी रुपये निधी मंजूर करून पहिल्या टप्प्यात २५ कोटी रुपये निधीला मंजुरी दिली होती. यानंतर या कामासाठी तीन वेळा विविध राजकीय पक्षांतर्फे भूमिपूजनही करण्यात आले होते. पण,रुग्णालयासाठीची जागा सत्र न्यायालय व न्यायाधीश निवासस्थान बांधण्यासाठी नियोजित करण्यात आल्याचे परिपत्रक" सार्वजनिक बांधकाम विभागाने काढल्याने रुग्णालयाचे काम थांबले होते. तसेच इतर काही अडचणींही निर्माण झाल्या होत्या. वसईतील लँड बेअरिंग क्रमांक ३७६ व सर्व्हे क्रमांक २७ ही सार्वजनिक बांधकाम विभागाची जागा ही बदली स्वरूपात

न्यायालय उभारणीसाठी देण्यात यावी व न्यायालयासाठी नियोजित असलेली जागा सार्वजनिक बांधकाम विभागाला वर्ग करण्यात यावी, असे परिपत्रकही काढण्यात आले होते. त्यामुळे महापालिकेने रुग्णालय उभारणीसाठी आरक्षित केलेल्या जागेचा पेच निर्माण झाला होता. त्यामुळे रुग्णालयाचे काम लांबणीवर पडत होते.

याबाबत २६ जानेवारीला झालेल्या जनता दरबारात हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी आमदार राजन नाईक यांनी या रुग्णालयाबाबत माहिती घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे हा विषय मांडला होता. तेव्हा फडणवीस यांनी याची तातडीने दखल घेत कोकण आयुक्तांना रुग्णालयासाठी तातडीने जागा देण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर कोकण आयुक्तांच्या दालनात बैठक बोलावण्यात आली होती. याबैठकीत कोकण आयुक्तांनी रुग्णालयाची जागा ताबडतोब महापालिकेला हस्तांतरीत करण्याचे निर्देश पालघर जिल्हाधिकाऱ्यांना दिले. त्यामुळे गेली अनेक वर्षे रखडलेल्या मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटलचा जागा हस्तांतरचा तिढा सुटून हॉस्पीटल बांधण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

वसई, विरारमध्ये महापालिकेचे एकही मल्टी स्पेशालिटी रुग्णालय नाही. आचोळे रुग्णालय मागील अनेक वर्षांपासून रखडले होते. या रुग्णालयाच्या जागेचा तिढा सुटत नव्हता. त्यामुळे नागरिकांना उपचारासाठी मुंबईकडे धाव घ्यावी लागत होती. अखेर हा तिढा सुटला असून, या रुग्णालयामुळे नागरिकांना वसई, विरारमध्येच सर्वच व्याधींवर उपचार घेणे शक्य होणार असून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. तसेच या रुग्णालयाच्या जागेच्या बदल्यात सार्वजनिक बांधकाम विभागाला पर्यायी जागादेखील देण्यात येणार असल्याचे बैठकीत ठरल्याचे आमदार नाईक यांनी सांगितले.

# बुलेट ट्रेनच्या पिलर खड्ड्यात बुडून 12 वर्षीय चिमुरड्याचा मृत्यू

**भिवंडी, दि. ९ : प्रतिनिधी**

बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी खोदकाम केलेल्या खड्ड्यात बुडून १२ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील कोपर गाव येथे सोमवारी सायंकाळी घडली आहे. या दुर्घटनेत देवव्रत जुगेश पांडे या १२ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.बुधवारी या पीडित परिवाराच्या कुटुंबियांना भिवंडी लोकसभा मतदार संघाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी भेट देत कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी पीडित परिवाराला न्याय मिळवून देण्यासाठी आपण पीडित परिवाराच्या पाठीशी खंबीर उभे असून त्यांना आवश्यक ती मदत मिळवून देऊ अशी प्रतिक्रिया यावेळी खासदार बाळ्या मामा यांनी दिली.कुटुंबियांचे सांत्वन केल्यानंतर खासदार बाळ्या मामा यांनी स्वतः दुर्घटना घडलेल्या ठिकाणी जाऊन घटनास्थळाची पाहणी केली.यानंतर नारपोली पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना दूरध्वनीवरून संपर्क साधून दुर्घटनेस जबाबदार असलेल्या कंपनी प्रशासनावर



योग्य ती कठोर कारवाई करण्याची मागणी केली.विशेष म्हणजे दुर्घटना घडल्यानंतर एल अँड टी कंपनीने खड्डा असलेल्या ठिकाणी बॅरिकेट व धोक्याची सूचना देणारे बॅनर लावले आहे.बुलेट ट्रेन प्रकल्पाचे तालुक्यातील काम युद्ध पातळीवर सुरू आहे.यासाठी एक अँड टी कंपनी कडून पिलर उभे करण्यासाठी खड्डे खोदले जात आहेत.कोपर गावाच्या हद्दीत अशाच एका खड्ड्यात पाणी साचले असताना देवव्रत जुगेश पांडे हा चौथीमध्ये शिक्षण घेणारा चिमुरडा छोटा भाऊ व मित्रांसोबत शिकवणी नंतर घरी येत असताना या खड्ड्यात साचलेल्या पाण्यात उतरले.त्यात खड्याचा अंदाज न आल्याने तीबूदल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या मृत्यूस एल अँड टि कंपनीचा बेजबाबदारपणा कारणीभूत असून दुर्घटना घडल्याच्या दिवशी खड्डयाला कोणत्याही प्रकारचे संरक्षण नव्हते. मात्र दुर्घटना झाल्यानंतर कंपनीने या ठिकाणी बॅरिगेट लावले आहे. त्यामुळे कंपनीचा हलगर्जीपणा व चतुराई दोन्ही चव्हाट्यावर आली असून या घटनेस जबाबदार असलेल्या कंपनी प्रशासनावर जो पर्यंत कठोर कारवाई होत नाही तोपर्यंत शांत बसणार नाही,लवकरच यासंदर्भात आपण पोलीस आयुक्तांची भेट घेणार असल्याची माहिती यावेळी खासदार बाळ्या मामा यांनी दिली आहे.

## पनवेल मालमत्ता कर भरणा दिपक फर्टिलायझरला कोणताही नाही

**पनवेल, दि. ९ : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका अंतर्गत तळोजा एमआयडीसी क्षेत्रातील दिपक फर्टिलायजर यांनी पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कराच्या नोटिसी विरोधात मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. या याचिकेच्या दिनांक ३ एप्रिल २०२५ रोजीच्या सुनावणीमध्ये महानगरपालिकेतर्फे वरिष्ठ अभियोक्ता आशुतोष कुंभकोणी यांनी बाजू मांडली. कुंभकोणी यांनी मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की मालमत्ता कराच्या नोटीसी विरोधात मनपा कायद्याच्या कलम ४०६ नुसार अपीलाचा पर्याय उपलब्ध असतानाही त्यांनी त्या पर्यायाच वापर न करताच उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे. यावर मा उच्च न्यायालयाने दीपक फर्टिलायजर यांना नोटीसीमध्ये मागणी केलेली मालमत्ता कराची सर्व रक्कम न्यायालयाकडे जमा करण्यास सांगितली असता, दिपक फर्टिलायजर यांच्या वकिलांनी केवळ ३ वर्षाची कराची रक्कम भरू असे सांगितले. यावर मा .उच्च न्यायालयाने त्यांची ही मागणी फेटाळून लावत मालमत्ता कर विषयक कोणताही दिलासा देण्यास दीपक फर्टिलायजर यांना नकार दिला आहे.

# पेण भागातील अनेक ठिकाणी चायनीज, धाब्यांवर अवैध मद्य विक्री

## कारवाईची नागरिकांकडून मागणी

**पेण, दि. ९ : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील अनेक ठिकाणी चायनीज धंदे सुरू असून त्या चायनीज, धाबे या धंद्यांवर रात्रीच्या सुमारास तळीरामांचा मोठा ताफा वळत असून तीथे अवैधपणे मद्य विक्री होत असल्याचे दिसून येत असतानाही याकडे मात्र संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा पेणमध्ये सुरू आहे.एकीकडे लग्नसराई तसेच यात्रा, उत्सव सुरू असल्याने अवैधपणे मद्य वक्री मोठ्या प्रमाणावर होऊ लागली आहे. त्यातच गेल्या काही दिवसांपासून तालुक्यातील काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर चायनीज धंदे, धाबे, सुरू झाले असल्याने या धंद्यांवर रात्रीच्या सुमारास अनेक तळीराम अवैधपणे दारू पीत बसलेले दिसत आहेत तर काही ठिकाणी तर चायनीज वरच अवैधपणे दारू विक्री केली जात आहे.त्यामुळे अशा ठिकाणी बसणाऱ्या तळीरामांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून याकडे मात्र राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुर्लक्ष असल्याचे बोलले जात आहे.

> रायगड जिल्ह्यातील बऱ्याच अवैध चायनिज सेंटर, ढाबे, हॉटेल्स यांच्यावर कारवाईचा बडगा जोरदार सुरू आहे, मात्र तरीही आमच्या नजरचुकीने कोणी असे धंदे करत असतील तर त्यांना सोडले जाणार नाही, नागरिकांनी अशा ठिकाणी जर असे धंदे होत असतील तर आम्हाला कळवावे, त्यांचे नाव गुप्त ठेवण्यात येईल यात चुकीला माफी नसेल.
>
> **संजय भोसले, उत्पादन शुल्क अधिकारी - रायगड**

# उमद्या कलाकाराचे असे अचानक जाणे..





मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील एक अत्यंत गुणी, बहुआयामी आणि लोकप्रिय अभिनेते विलास उजवने यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या अचानक जाण्याने मराठी कलाविश्वावर शोककळा पसरली असून चाहत्यांसह सहकलाकारही अत्यंत दुःखी झाले आहेत.

विलास उजवने यांनी आपल्या अभिनयाची सुरुवात रंगभूमीवरून केली होती. ते एक उत्कृष्ट रंगकर्मी म्हणून ओळखले जात होते. पुढे त्यांनी अनेक मराठी मालिकांमध्ये आणि चित्रपटांमध्ये काम करत आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या सहज अभिनयशैलीमुळे ते प्रेक्षकांच्या मनात घर करून राहिले.

विलास उजवने यांची खासियत म्हणजे त्यांनी विनोदी, गंभीर, ग्रामीण आणि शहरी अशा विविध प्रकारच्या भूमिका समर्थपणे रंगवल्या. त्यांची संवादफेक, चेहऱ्यावरचे हावभाव आणि सादरीकरणाची शैली यामुळे प्रत्येक भूमिका लक्षवेधी ठरली. त्यांनी देवकी, जय मल्हार, तुझ्यात जीव रंगला, चला हवा येऊ द्या यांसारख्या मालिकांमध्ये लक्षवेधी भूमिका साकारल्या. ग्रामीण भूमिकांमध्ये त्यांची छाप अधिक उठून दिसत असे. चित्रपटांमध्येही त्यांनी आपली कला सिद्ध केली होती.

विलास उजवने हे केवळ कलाकार नव्हते, तर एक हसतमुख, प्रेमळ आणि सदैव सकारात्मक दृष्टिकोन असलेले व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या हास्याच्या लहरींनी अनेकांचे आयुष्य खुलवले. गावोगावी नाटकांच्या दौऱ्यांतून त्यांनी रसिकांशी एक नातं निर्माण केलं होतं.

त्यांच्या निधनामुळे मराठी मनोरंजन सृष्टीत निर्माण झालेली पोकळी भरून न निघणारी आहे. त्यांनी आपल्या कामातून मराठी संस्कृतीचे दर्शन घडवले आणि प्रेक्षकांना अंतर्मुख करणारे अनुभव दिले. विलास उजवने यांना अखेरचा निरोप देण्यासाठी अनेक चाहत्यांनी आणि सहकाऱ्यांनी त्यांच्या घरी भेट दिली. त्यांच्या जाण्याने उरलेली आठवण ही त्यांच्या अमर भूमिकांमधून कायम राहील.

डॉ. उजवणे यांचा कलाजगतातील प्रवास हा केवळ अभिनयापुरता मर्यादित नव्हता. त्यांना शैक्षणिक पार्श्वभूमीही होती आणि म्हणूनच त्यांच्या भूमिकांमध्ये एक अभ्यासू सखोलता जाणवायची. रंगभूमीपासून ते रूपेरी पडद्यापर्यंतचा त्यांचा प्रवास हा नाट्यशास्त्राच्या प्रेमातून जन्मलेला होता.

**सामाजिक भान असलेला अभिनेता**

डॉ. विलास उजवणे यांनी अनेकदा सामाजिक आशय असलेल्या चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. 'डोम', 'इन द नेम ऑफ ताई' यांसारख्या चित्रपटांमध्ये त्यांनी सामाजिक विषमता, अन्याय आणि मूल्यभंग यावर बोट ठेवणा?या व्यक्तिरेखा रंगवल्या. त्यांच्या संवादफेकीत आणि देहबोलीत एक ताकद होती ज्ञ जी थेट प्रेक्षकांच्या मनापर्यंत पोहोचायची.

ते ग्रामीण भागातील जीवनाचे, संस्कृतीचे आणि माणसांचे खरे चित्र उभे करत असत. त्यांच्या भूमिकांमध्ये गावपणाचा गंध असायचा. 'गाव आलं गोट्यात १५ लाख खात्यात' किंवा 'धोलकी'सारख्या चित्रपटांमधून त्यांनी गावकऱ्यांचा आवाज बनून सामाजिक वास्तव दाखवले.

त्यांच्या निधनाने एक अशी शांत, पण दर्जेदार अभिनयशैली हरवली आहे, जी कधीही उगाच गोंगाट करत नव्हती, पण जेव्हा बोलायचं तेव्हा काळजात जाऊन भिडायची. मराठी सिनेसृष्टीसाठी ही फार मोठी पोकळी आहे.

**अभंगात रंगलेली जिवंत अनुभूती**

डॉ. विलास उजवणे हे मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीत बहुआयामी भूमिकांसाठी ओळखले जात होते. परंतु त्यांच्या अभिनय प्रवासातील एक खास टप्पा म्हणजे संत तुकाराम यांची भूमिका. ही भूमिका त्यांनी इतक्या श्रद्धा, समर्पण आणि आत्मिक भावनेने साकारली की ती प्रेक्षकांच्या मनावर कोरली गेली.

तुकाराम हे केवळ संत नव्हते; ते विचार होते, आंदोलन होते, लोकमानसातलं श्रद्धास्थान होते. अशा



डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर.
9422125656

एका महामानवाची भूमिका साकारताना केवळ अभिनयाचीच गरज नसते, तर त्या व्यक्तिरेखेचा आत्मा आपल्या आत झिरपवावा लागतो. डॉ. उजवणे यांनी ही भूमिका साकारताना केवळ पोशाख, हावभाव यांच्यावर भर दिला नाही, तर त्यांच्या अभंगांतील आत्मिक ऊर्जा सादरीकरणातून झळकत होती.

**वाणी आणि देहबोलीतील संयम**

तुकारामांची भूमिका साकारताना डॉ. उजवणे यांनी दाखवलेली वाणीतील माधुर्य, शांतता आणि अंतरंगातील वेदनेचा संयमित आविष्कार यामुळे प्रेक्षक भारावून गेले. ते तुकाराम साकारणारे नव्हते ते झाले होते. त्यांची डोळ्यांतली भक्ती, शब्दांतला विश्वास, आणि देहबोलीतला समर्पणभाव – हे सगळं तितकंच जिवंत होतं.

**प्रबोधनपर रंगभूमीची ताकद**

त्यांनी ही भूमिका रंगभूमीवर अनेक ठिकाणी सादर केली होती. ग्रामीण भागातील तमाशा, लोकनाट्य, आणि भजन मंडळींसोबत मिळून त्यांनी तुकारामांचे विचार गावोगावी पोहोचवले. ही केवळ नाट्यकृती नव्हती, तर एक प्रकारची सामाजिक प्रबोधनाची चळवळ होती.

**अभंग वाचन आणि अनुभव**

डॉ. उजवणे हे स्वतः संत साहित्याचे अभ्यासक होते. त्यामुळे त्यांच्या तुकाराम सादरीकरणात अभंगांचा फक्त गानामधील उपयोग नव्हता, तर त्या शब्दांचा अर्थ, त्यामागचं तत्त्वज्ञान आणि सामाजिक विद्रोह यांचेही दर्शन घडायचे.

**एक जिवंत तुकाराम**

आजही अनेक प्रेक्षक, रसिक, आणि कलावंत डॉ. उजवणे यांचे तुकाराम म्हणून केलेले सादरीकरण आठवतात तेव्हा डोळ्यांत पाणी येते. ही भूमिका त्यांनी ज्या निष्ठेने साकारली, ती अभिनयाच्या पलीकडची होती.. ती होती भक्तीची अनुभूती.

डॉ. विलास उजवणे यांच्या तुकाराम भूमिकेने मराठी रंगभूमीवर एक भक्तिरसाचा नवा अध्याय लिहिला. ते एका कलाकारापेक्षा जास्त एक विचार बनले.

**डॉ विलास उजवणे आणि नागपूर**

डॉ. विलास उजवणे यांचे नागपूर शहराशी विशेष नाते आहे. त्यांनी नागपूरमध्ये आपले बालपण आणि शिक्षण पूर्ण केले. नागपूरमधील रंगभूमीवर त्यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली.

नागपूरच्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखेच्या वर्धापन दिन आणि पुरस्कार सोहळ्यात २०२४ मध्ये त्यांनी तरुण कलाकारांना मुंबईत आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन दिले. ते म्हणाले, "नागपूरने अनेक महान आणि प्रभावशाली कलाकार घडवले आहेत. मी स्वतः येथे माझ्या ज्येष्ठांकडून खूप काही शिकलो आहे."

डॉ. विलास उजवणे हे नागपूरचे रहिवासी आहेत. त्यांनी नागपूरमध्ये आपले बालपण आणि प्रारंभिक शिक्षण पूर्ण केले. नंतर त्यांनी अभिनय क्षेत्रात करिअर करण्यासाठी मुंबईकडे प्रयाण केले. एका मुलाखतीत त्यांनी सांगितले की, "मी नागपूरचा आहे, परंतु आता मुंबईत स्थायिक झालो आहे." त्यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. २०१६ साली विदर्भ गौरव प्रतिष्ठानने त्यांना स्मिता पाटील पुरस्काराने सन्मानित केले होते.

**आमच्या घरी सदिच्छा भेट**

काही वर्षांपूर्वी नागपूरला आले असताना त्यांना अर्धांगवायूचा त्रास झाला त्यामुळे त्याचा पाय, हात व वाचा ही बाधित झाली. त्यामुळे ते माझ्याकडे उपचाराकरिता आले होते. त्यांना बराच फायदा झाला आणि आमचे सबंध घट्ट झाले. त्यांनी आमच्या घरी आवर्जून भेट दिली. त्या आठवणी आता आठवणीच राहतील.

■ ■ ■

# वाजपेयी ते मोदी...

जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून ज्याची नोंद झाली आहे, अशा भारतीय जनता पार्टीच्या (भाजपा) ४५ वर्षांच्या इतिहासात अनेक चढ-उतार आले. भाजपाची स्थापना ६ एप्रिल १९८० मध्ये झाली, पण या पक्षाची नाळ १९५१ मध्ये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी स्थापन केलेल्या भारतीय जनसंघाशी जोडलेली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या पहिल्या सरकारमध्ये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी हे सदस्य होते. पण काँग्रेस पक्षाची धर्मनिरपेक्ष राजनीती व मुस्लिमांचे लांगूलचालन याच्या ते सुरुवातीपासून विरोधात होते. डॉ. मुखर्जी यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली व राष्ट्रवाद आणि हिंदू राष्ट्रवादी विचारधारेला त्यांनी उत्तेजन दिले. १९५२ मध्ये झालेल्या लोकसभेच्या पहिल्या निवडणुकीत भारतीय जनसंघाचे केवळ तीन खासदार निवडून आले होते. १९७७ पर्यंत भारतीय जनसंघ पक्ष संसदेत नगण्य होता.

--------------

तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी १९७५ मध्ये देशात आणीबाणी लागू केली व त्याला भारतीय जनसंघाने जोरदार विरोध केला. अठरा महिने भारतीय जनसंघासह देशातील सर्वच प्रमुख विरोधी पक्षांचे शेकडो नेते व हजारो कार्यकर्ते जेलमध्ये होते. १९७७ मध्ये इंदिरा गांधींच्या सरकारने आणीबाणी मागे घेतली आणि देशात लोकसभा निवडणुका घोषित झाल्या. त्या वेळी देशातील सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन लोकनेते जयप्रकाश नारायण यांच्या प्रेरणेतून जनता पक्षाची स्थापना केली.

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

केंद्रात मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले, पण अंतर्गत लाथाळ्या, गटबाजी, अहंकार आणि जनता पक्षातील पूर्वाश्रमीच्या जनसंघीयांच्या दुहेरी सदस्यत्वाच्या मुद्द्यावरून समाजवाद्यांनी घेतलेला आक्षेप, यामुळे मोरारजी देसाई सरकार अडीच वर्षांतच कोसळले. जनसंघीयांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध ठेवता कामा नयेत अशी भूमिका मधू लिमये व अन्य समाजवादी नेत्यांनी घेतली होती. जनसंघातील नेत्यांनी त्याला धूप घातली नाही. जनता पक्षात फूट पडली. पूर्वाश्रमीच्या भारतीय जनसंघातील नेत्यांनी स्वतंत्र मार्गावर जाण्याचे ठरवले आणि त्यातूनच भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली.

भाजपाचे पहिले अध्यक्ष म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांची निवड झाली. सुरुवातीच्या काळात भाजपाला फारसे यश लाभले नाही. पण राम जन्मभूमी आंदोलन सुरू झाले आणि भाजपाला यशाचा मार्ग सापडला. राम जन्मभूमी आंदोलनानेच भाजपाला दिल्लीच्या तख्तापर्यंत पोहोचवले.

देशाच्या राजकारणात भाजपाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. १९९० सालापर्यंत भाजपा-काँग्रेस पक्षाला केंद्रात आणि विविध राज्यांत सत्तेवरून उलथवून टाकेल असे कोणत्याही ज्योतिष्याने भविष्य वर्तवले नव्हते. लाखो कार्यकर्त्यांची मेहनत, अमितभाई शहा यांचे संघटन कौशल्य आणि नरेंद्र मोदींचा करिष्मा यातून आज देशात २० हून अधिक राज्यांत भाजपा सत्तेवर आहे. सोळा राज्यांत भाजपाचे स्वतःचे सरकार आहे.

अटल-अडवाणी कमल निशान, माँग रहां हैं हिंदुस्थान..., राज तिलक की तैयारी करों, आ रहें है, भगवाधारी... मंदिर वही बनाएंगे, अशा घोषणा देत अटल-अडवाणींच्या काळात भाजपाने दिल्लीकडे वाटचाल केली.

गेल्या अकरा वर्षांपासून भाजपामध्ये मोदी-शहा यांचे पर्व सुरू झाले आहे. घर घर मोदी-हर हर मोदी, जो राम को लाएं हैं, हम उनको लाएंगे अशा घोषणातून देशभर भाजपाचा विस्तार झालाय. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशींच्या काळात भाजपा मित्रपक्षांच्या शोधात होती, आता देशात भाजपा केंद्रस्थानी राहणार हे देशातील सर्व प्रादेशिक पक्षांना कळून चुकले आहे. स्वबळावर केंद्रात भाजपाची सत्ता स्थापन करण्याचा पराक्रम मोदींनी करून दाखवला.

२०१४ मध्ये लोकसभेत भाजपाचे २८२ खासदार निवडून आले, तर २०१९ मध्ये भाजपाचे ३०३ खासदार विजयी झाले. सन २०२५ मध्ये अब की बार चार सौ पार हे भाजपाचे स्वप्न होते पण ते भंगले.

२०२४ मध्ये भाजपाचे सर्वाधिक म्हणजे २४० खासदार निवडून आले व मित्रपक्षांच्या मदतीने लोकसभेत २९३ आकडा गाठला व सलग तिसऱ्यांदा एनडीएचे सरकार स्थापन झाले.

नरेंद्र मोदींनी पंतप्रधानपदाची हॅटट्रीक संपादन तर केलीच. पंडित नेहरूंनंतर हॅटट्रीक साधणारे देशाचे दुसरे पंतप्रधान अशी त्यांची इतिहासात नोंद झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदींची हिम्मत आणि लोकप्रियता, अमितभाई शहांची चाणक्यनीती, आदित्यनाथ योगींचे आक्रमक हिंदुत्व यातून भाजपाचा अश्वमेध देशभर आज दौडताना दिसतो आहे.

पण या ४५ वर्षांच्या वाटचालीत अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी आदींची तपस्या, धैर्य व त्याग यांचे मोठे योगदान आहे. अडवाणी यांच्या राम रथयात्रेने व जोशींच्या तिरंगा यात्रेने पक्षाला देशपातळीवर नेले व पक्षात नवचैतन्य निर्माण केले. देशात अनेक राजकीय पक्ष आहेत की, त्यांच्यात वारंवार फाटाफूट झाली किंवा विभाजन झाले. भाजपा हा एकच पक्ष आहे की, तो सर्वत्र विस्तारत असतानाही अभंग आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्कारातून तयार झालेले कार्यकर्ते हा भाजपाचा मुख्य आधार आहे. तो कधी विचलीत होत नाही, निष्ठा बदलत नाही. त्याला सत्तेचा मोह नाही. त्याची बांधिलकी विचारांशी आहे.

अयोध्येत भव्य राम मंदिर उभारून भाजपाने सर्व देशांतील कोटी कोटी जनतेची इच्छा पूर्ण केली. जम्मू-काश्मीरला विशेषाधिकार दिलेल्या घटनेतील ३७० व्या कलमाचे सुरक्षा कवच काढून घेतले, लोकसभा-विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा कायदा संसदेत मंजूर करून घेतला, वक्फ बोर्डाच्या मनमानी कारभारावर लगाम घालणाऱ्या कायद्यात सुधारणा केली, तिहेरी तलाक पद्धत रद्द करून लाखो मुस्लीम महिलांना दिलासा दिला.

राष्ट्रवाद व सांस्कृतिक एकता या विचारांना भाजपाने नेहमीच प्राधान्य दिले. एनडीएमधील जुन्या मित्र पक्षांबरोबरच नव्याने एनडीएमध्ये आलेल्या मित्रपक्षांना सन्मान देण्यासाठी भाजपाला अनेकदा कसरत करावी लागते आहे.

इंदिरा गांधींच्या हत्येनंतर निर्माण झालेल्या सहानुभूतीच्या लाटेमुळे १९८४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे ४०० पेक्षा जास्त खासदार निवडून आले होते व भाजपाचे केवळ दोनच खासदार विजयी झाले. दोन खासदारांपासून भाजपाची सुरुवात झाली आणि गेल्या तीन निवडणुका सर्वाधिक खासदारांचा पक्ष म्हणून भाजपाने संसदेत स्थान मिळवले.


अटलबिहारी वाजपेयी हे (१९८० ते १९८६) भाजपाचे पहिले अध्यक्ष होते व देशाचे तीन वेळा पंतप्रधान झाले. लालकृष्ण अडवाणी हे (१९८६ ते ९१, १९९३ ते ९८, २००४-२००५) तीन वेळा पक्षाचे अध्यक्ष होते, देशाचे गृहमंत्री व उपपंतप्रधान झाले. मुरली मनोहर जोशी (१९९१-९३), कुशाभाऊ ठाकरे (१९९८-२०००), जना कृष्णमूर्ती (२००२-२००४), वेंकय्या नायडू (२००२- २००४), नंतर उपराष्ट्रपती झाले. नितीन गडकरी (२००९-२०१३) पक्षाचे अध्यक्ष होते व केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री आहेत. अमितभाई शहा हे २०१४ ते २०२० पक्षाचे अध्यक्ष होते, केंद्रीय गृहमंत्री आहेत. जगत प्रसाद नड्डा हे पक्षाचे विद्यमान अध्यक्ष असून केंद्रीय आरोग्यमंत्री आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भाजपाचे सर्वात लोकप्रिय नेते आहेत. त्यांच्याएवढी उत्तुंग लोकप्रियता देशातील अन्य कोणा राजकीय नेत्याला लाभली नाही. गेल्या वर्षी ५४३ जागांसाठी झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर भाजपाप्रणीत एनडीएच्या २९३ खासदारांचे समर्थन घेऊन नरेंद्र मोदी देशाचे सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले.

आंध्र प्रदेशमधील चंद्राबाबू नायडू यांचा तेलुगू देशम व बिहारमधील नितीश कुमार यांचा जनता दल युनायटेड या दोन प्रमुख पक्षांनी मोदी सरकारला पाठिंबा दिलेला आहे. लोकसभेत भाजपाचे २४० व राज्यसभेत ९८ खासदार आहेत. देशभरातील विधानसभांमध्ये भाजपाचे १६५६ व विधान परिषदांमध्ये १६५ आमदार आहेत. देशभरात २५ कोटी सदस्य संख्या नोंदविण्याचे लक्ष्य भाजपाने ठरविले आहे.

■ ■ ■

# राज्यभरात रूग्णांची लूट




पुणे येथील दीनानाथ रुग्णालयाशी संबंधित तनिषा भिसे गरोदर माता मृत्यू प्रकरणानंतर खडबडून जागे झालेल्या पुणे महापालिकेने शहरातील सर्वच खासगी रुग्णालयांना नोटीस बजावून उपचारापूर्वी डिपॉझिट घेण्यास मनाई केली आहे. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णावर प्रथम उपचार करा त्यानंतर त्यांच्याकडे पैसे मागा, असे या नोटीसीत नमूद करण्यात आले आहे.

तथापि, असले प्रकार केवळ दीनानाथ मंगेशकर धर्मादाय रूग्णालयाशीच संबंधित नाहीत तर राज्यभरातील अनेक रूग्णालये रूग्णांच्या जिवीताशी खेळण्याचा आणि त्यांना लुटण्याचा प्रकार करीत आहेत.

तनिषा भिसे नामक गरोदर महिलेला दीनानाथ रुग्णालयात गंभीर स्थितीत प्रसूतीसाठी आणण्यात आले होते. पण रुग्णालय प्रशासनाने त्यांना 10 लाखांचे डिपॉझिट भरल्यानंतरच दाखल करून घेण्याची भूमिका घेतली होती. परिणामी, उपचारास विलंब झाल्यामुळे तनिषा यांचा मृत्यू झाला. तेव्हापासून दीनानाथ रुग्णालयावर टीकेची झोड उठली आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेने सर्वच खासगी रुग्णालयांना नोटीस बजावली आहे.

महापालिकेने आपल्या नोटीसीत सर्वच खासगी रुग्णालयांना रुग्णांकडून उपचारापूर्वी डिपॉझिट न घेण्यास बंदी घातली आहे. तातडीच्या उपचारांची गरज असलेल्या रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांकडून कोणतीही अनामत रक्कम घेतली जाऊ नये. सर्वप्रथम रुग्णावर उपचार करण्यास प्राधान्य दिले जावे, असे निर्देश मनपाने आपल्या तातडीच्या नोटीसीद्वारे दिलेत. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे इमर्जन्सी स्थितीत रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, पुणे पोलिसांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रकरणात वैद्यकीय दुर्लक्षीपणा आढळला तर गुन्हा दाखल करण्याचे संकेत दिलेत. या प्रकरणी पोलिसांनी ससूनच्या अधीक्षकांना पत्र लिहून स्पष्टीकरण मागितले आहे. यासंबंधीच्या सरकारी अहवालात तनिषा भिसे यांना रुग्णालयात गंभीर स्थितीत तब्बल साडेपाच तास बसवून ठेवल्याची बाब समोर आली आहे. ही वैद्यकीय नेगलिजन्सची बाब आहे. यामुळे उपचारास विलंब झाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी या प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रे आपल्या पत्रासोबत जोडल्याची माहिती आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे तनिषा भिसे यांच्या कुटुंबीयांकडे 10 लाख रुपयांच्या डिपॉझिटची मागणी करणाऱ्या डॉक्टर सुश्रुत घैसास यांनी सोमवारीच आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपल्या राजीनामा पत्रात दीनानाथ रुग्णालयाच्या नावलौकीकास गालबोट लागत असल्यामुळे राजीनामा देत असल्याचे नमूद केले आहे.

या रूग्णालयाशी संबंधित आणखी एक प्रकार म्हणजे सदर रूग्णालयाकरिता ज्या कुटुंबियांनी त्यांची 6 एकर जमीन दान दिली होती ती राजकीय दबाव टाकून मिळविण्यात आल्याचे पुढे येत आहे. सरकारी जमिनी लाटायच्या किंवा दबाव टाकून खाजगी जमिनी बळकवायच्या, त्यावर धर्मादाय रूग्णालये उभारायची, आयकर आणि अन्य बाबींमधून सूट मिळवायची आणि दुसरीकडे, रूग्णांची लूट करायची, असले धंदे अनेक रूग्णालयांकडून केले जात आहेत.

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना अनेक रूग्णालयात आहे. येथे विविध आजाराच्या रूग्णांवर 1 रूपयाही न घेता मोफत उपचार करावयाचे असतात. परंतु, अनेक रूग्णालयात सर्रास लूट केली जाते. शासनाकडून लवकर पैसे येत नसल्याची सबब पुढे करीत रूग्णांकडून आधी वसुली केली जाते. औषध आणि भोजनाचे पैसे त्यांच्याकडून घेतले जातात. यातील काही रूग्णालये लोकप्रतिनिधींचे किंवा त्यांच्या नातेवाईकांच्या नावावर आहेत, हे उल्लेखनीय. नागपूर किंवा अन्य मोठ्या शहरातील खाजगी रूग्णालयांच्या डॉक्टरांना आता बाहेर कसाई असा शब्दप्रयोग होवू लागला आहे.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### सणसणीत चपराक?

बदलापूर प्रकरणातील अक्षय शिंदे बनावट एन्काऊंटर प्रकरणी उच्च न्यायालयाने राज्य सरकारला सणसणीत चपराक लगावली आहे. संबंधित पोलिसांवर गुन्हा दाखल करून त्यांना निलंबित करा, असे आदेश मुंबई हायकोर्टाने दिलेत. अक्षय शिंदे बनावट एन्काऊंटर प्रकरणी मुंबई हायकोर्टात सुनावणी झाली. या सुनावणीत मुंबई हायकोर्टाने आदेश जारी केले आहेत. अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणातील ज्या पोलिसांवर आरोप होते, त्या पोलिस अधिकाऱ्यांवर मॅजिस्ट्रेट कोर्टाने एक अहवाल तयार केला होता. त्यात पोलिसांवर ठपका ठेवण्यात आला होता. या प्रकरणातील पाच पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहेत. न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि गोखले यांच्या खंडपीठाने हे आदेश जारी केले आहेत. मुंबई पोलिस सहआयुक्त गुन्हे यांना या प्रकरणी एसआयटी स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अक्षय शिंदेचे वडील अण्णा शिंदे यांनी पोलिसांवर कारवाईची मागणी करत याचिका दाखल केली होती.

आता नव्याने हे प्रकरण सुरू होणार आहे. मुळात विषय हा आहे की, अक्षय शिंदे याचे एन्काऊंटर करण्याचा निर्णय कुणी पोलीस अधिकाऱ्याने घेतला की त्यांना मुख्यमंत्री, गृहमंत्री यापैकी कुणी आदेश दिलेत? मंत्र्यांच्या आदेशाशिवाय वरिष्ठ पोलीस अधिकारी थेट एन्काऊंटर करण्याचे धाडस करू शकणार नाहीत.

ही घटना घडली तेंव्हा सत्ताधारी पक्षाच्या अनेक मंत्र्यांनी एन्काऊंटरचे समर्थन केले होते. आता संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश कोर्टाने दिल्याने पेच निर्माण झाला आहे. संबंधित पोलीस अधिकारी बचावासाठी आदेश देणाऱ्या मंत्र्यांचे नाव उघड करू शकतात.

■ समिर आकरे, नागपूर.

# कोणाला चावायचे याची निवड मच्छर कशी करतात?



उन्हाळ्याचे दिवस असून डासांचा उपद्रव याकाळात सर्वाधिक असतो. काही लोकांना मच्छर किंवा डास खुपच त्रास देतात. तर काही लोकांना कमी त्रास देत असतात. तुमच्या बाजूला बसलेल्या मित्राला डास चावत नाहीत आणि तुम्हाला मात्र डासांनी फोडून खाल्लेले असते.

असे नेमके का होते. काही लोकांना डास जास्तच चावतात. तर काही लोकांना कमी असे का असते? या मागे विज्ञान आहे. काही रक्त गटाच्या लोकांना जादा मच्छर चावतात तर काही रक्त गटाच्या लोकांना कमी चावतात असेही बरेचदा असते. डासांच्या चावण्यामागे शरीराचा गंध, रक्तगट, तापमान नेमके काय असते? काहींना डास कमी तर काहींना जास्त चावण्यामागचे नेमके कारण काय असते?

**कार्बनडाय ऑक्साईड आणि मच्छर**

मच्छर माणसांना शोधण्यासाठी कार्बन डायऑक्साईडची ($CO_2$) मदत घेत असतात. म्हणजे आपण जो उच्छवास सोडतो त्याचा ते अदमास घेत असतात. ज्या लोकांच्या शरीरातून कार्बनडाय ऑक्साईड जादा निघतो त्यांना किंवा मोठे उंचीने अधिक असलेल्यांना मच्छर अधिक निशाणा बनवित असतात.

**शरीराच्या तापमानाचा अदमास**

सुमारे 5 ते 15 मीटर अंतरावरुन डासांना माणसे दिसत असतात. माणसांच्या जवळ पोहचल्यानंतर ते आपल्या दृष्टीचा वापर करत असतात. ते जेव्हा आपल्या शरीराच्या एकदम जवळ पोहचतात. तेव्हा ते शरीराच्या तापमानाचा अदमास घेतात. त्यावेळी ते एखाद्या व्यक्तीला चावायचे की नाही याचा निर्णय घेत असतात.

आपल्या शरीरातून निघालेले गंध देखील मच्छरांना अधिक आकर्षित करीत असतो. घामात असलेल्या लॅक्टीक एसिड, युरिक एसिड आणि अमोनिया सारख्या रसायन मच्छरांना आवतण देत असतात. प्रत्येक माणसाचा शरीराचा गंध वेगवेगळा असतो. जी जिन्स आणि बॅक्टेरियावर अवलंबून असते. त्यामुळे ज्याच्या शरीरातून अधिक वास येतो त्याला सर्वाधिक डासांचा उपद्रव होतो. त्यालाच डास जास्त चावत असतात.

अनेक संशोधनात हे स्पष्ट झाले की O रक्त गटाच्या लोकांना मच्छर जास्त चावतात. तसेच A रक्त गटाच्या लोकांना मात्र मच्छर कमी पसंत करतात. मच्छर काही रक्त गटांत असलेल्या रासायनिक घटकांना आकर्षित होऊन त्या व्यक्तींना जास्त चावत असतात.

अधिक तापमान असलेल्या किंवा अधिक घाम येणाऱ्या व्यक्तींच्या शरीराकडे मच्छर कायम आकर्षित होत असतात. मच्छरांना त्यांना चावणे आवडते. म्हणून उन्हाळ्यात व्यायाम केल्यानंतर मच्छर त्यांना अधिक चावत असतात.घामातून नघणारा ओलावा थंडावा आणि वास मच्छरांना जवळ बोलावतो. परंतू हे अजून सिद्ध झालेले नाही तुम्हाला नेमके याच कारणांसाठी मच्छर चावतील,परंतू हे एक मोठे कारण जरुर आहे.

अशोकायन
प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)




## अहिंसा परमो धर्म!

'जगा व जगू द्या ' ची शिकवण
देती महावीर स्वामी
हिंसा करणे ही तर
पशुत्वाची निशाणी...!

काया वाचा मनसाही
घडूच नये चुकून हींसा
शाकाहार  मानवी प्रकृती
मासांहार ही समजावी विकृती

अहं ठेवूनी बाजूला
करावी त्यांची क्षमायाचना
आपल्या कृतीने अजानता
झाली ज्यांच्या मनी यातना ..!








## आज का अंदाज

गुरूवार १० मार्च २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 1 | 4 | 5 | 8 |
|---|---|---|---|
| 155 | 789 | 799 | 279 |
| 588 | 446 | 122 | 468 |
| 290 | 347 | 500 | 350 |
| 19 | 49 | 57 | 87 |
| 12 | 42 | 56 | 86 |
| 10 | 40 | 53 | 83 |

मुंबई बाजार


| 4 | 7 | 8 | 9 |
|---|---|---|---|
| 257 | 250 | 134 | 270 |
| 112 | 368 | 350 | 469 |
| 356 | 133 | 567 | 199 |
| 40 | 70 | 86 | 96 |
| 41 | 71 | 83 | 93 |
| 42 | 72 | 85 | 95 |

१० एप्रिल २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 31 | 61 | 98 | 08 |
| 35 | 65 | 94 | 04 |
| 37 | 67 | 92 | 02 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


## शब्दकोडे क्रमांक २०८०




**आडवे शब्द :-**
१) आदर्श दांपत्य
७) संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
१०) खिडकी
११) बोकड एडका
१२) नमस्काराचा एक प्रकार
१३) रेशीमाचे जाडसर कापड
१५) हिंमत, धैर्य
१७) वेळ
१८) चिंतन
२०) पिता, निर्माता
२१) यज्ञ
२२) लोणी
२५) च्या बरोबर
२६) छिद्र, दोष, न्यून
२७) परमेश्वर
२९) नंतर
३१) काळी मैना
३४) आवाज
३६) शिक्षक
३७) पत्र
३९) दात
४०) संस्थेचे धोरण ठरविणारा व चालविणारा
४१) जतन, काळजी
४२) सोन्याचा पर्वत
४४) प्रतिष्ठा, अब्रू
४६) बशीचा जोडीदार
४७) विविध
४८) बाई
५०) हात
५१) टणक
५४) नारायणराव पेशव्यांचे अखेरचे उद्गार
५७) श्वसनेंद्रिय
५८) माल साठविण्याची जागा
५९) प्रहर
६१) पृष्ठभागावरील छोटा तुकडा
६३) चेतक घोड्याचा मालक असलेला राजा ** *** सिंग
६५) नाचणी धान्याचे एक नाव
६६) संन्यासाचे निवासस्थान
६७) कट्टर, मताशी ठाम असलेला
६८) कमळ
७०) उपासना, प्रार्थना, पूजा
७१) अभिप्राय, हेतू, अर्थ
७३) वांती
७५) राजा
७६) समशेर
७७) अंग रगडणे, चोळणे

**उभे शब्द :-**
१) कपाळ
२) सुंदर, शहाणा
३) पोपट
४) पुरुन ठेवले द्रव्य
५) चालविणारा
६) पादत्राण
७) पळून जाणे
८) ** दाम दंड भेद
९) नेत्र
१२) सारखा
१४) सखी, मैत्रीण
१६) मध
१७) ठाणवई
१८) ** माऊ-मांजर
१९) मान खाली घालणे विनम्र होणे
२०) गरळ, विष
२३) छाती
२४) सरसकट
२५) संपूर्ण
२८) बाण
३०) मगज
३२) नमस्कार
३३) ढग
३५) पाहिला ऋतू
३६) धनी
३८) घोडे बांधण्याची जागा
३९) रचना करणारा
४२) लाकडाचा वा दगडाचा पातळ तुकडा
४३) अक्षरापुढची उभी रेघ
४४) आत्म्याचा दुसऱ्या शरीरात प्रवेश
४५) अनुमती
४६) वैताग, बडबड
४८) चौक
४९) पुष्पगुच्छ
५०) केस
५२) हरभरा(हिं )
५३) त्वेष, आवेश
५५) माया, प्रेम
५६) बातमी
६०) वंदनाचा एक शब्द
६२) सिंह
६३) पोपट
६४) वाचेच्या चार अवस्थेतील पहिली, श्रेष्ठ भक्ती
६५) समुद्रातील तांबड्या रंगाचा मासा
६७) तंबू, नाटक यामधील कापडी भिंत
६९) आयुष्य, पाणी
७०) करवत
७१) अजगर
७२) मृत्युराजा
७४) व्यापारी फायदा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



महासागर



# अडीच कोटींच्या रुपयांचा चुराडा

## बदलापूर नगरपरिषदेच्या घंटागाड्या भंगारात

**बदलापूर,दि. ९ प्रतिनिधी**



बदलापुरकरांच्या कराच्या पैशांतून लाखो रूपये खर्चून घेतलेल्या या गाड्या वापराविना भंगारात सडत असल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने २०१८ वर्षामध्ये विकत घेतलेल्या ४२ घंटागाड्या पालिकेने सात वर्षामध्ये भंगारात काढल्या आहेत. धक्कादायक बाब म्हणजे गेल्या सात वर्षाभर ह्या घंटागाड्या धुळखात पडून होत्या. लोकप्रतिनिधींनी विविध कारणे दाखवत त्या त्या वेळी या घंटागाड्या रस्त्यावर उतरू दिल्या नाहीत. अखेर वाहतुकीस योग्य नसल्याचे सांगत पालिकेने या गाड्या आता भंगारात विकण्यास काढल्या आहेत. बदलापुरकरांच्या कराच्या पैशांतून लाखो रूपये खर्चून घेतलेल्या या गाड्या वापराविना भंगारात काढल्याने नागरिकांत संताप आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत गेल्या काही वर्षात स्थानिक स्वराज्य संस्थांनी कोट्यावधींचा खर्च केला. मात्र कचरा व्यवस्थापनासह अनेक गोष्टी शहरात होऊ शकल्या नाहीत. कुळगाव बदलापूर नगरपालिकेने शहराच्या घनकचरा व्यवस्थापनाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला होता. त्यानुसार शहरातील कचरा उचलण्यासाठी ४२ घंटागाड्यांची गरज अहवालात नमूद केली होती. त्यामुळे कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने ५ लाख ८६ हजार ९९० रूपये प्रति वाहन या दराने ४२ गाड्यांची खरेदी केली होती. ऑगस्ट २०१८ मध्ये झालेल्या सर्वसाधारण सभेत परिषदेने घंटागाई आणि सफाई कामगारांचा प्रस्ताव सभेपुढे ठेवला होता. लोकसंख्यानिहाय गाड्यांचे वाटप आणि त्यानुसार कंत्राटदार नेमला जाणार होता. मात्र त्यापूर्वीच ऑक्टोबर २०१८ मध्ये ४२ घंटागाड्या शहरात दाखल झाल्या. तेव्हापासून आजतागायत या घंटागाड्या परिषदेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रात धुळखात पडून आहेत. यातील काही गाड्या काही दिवस वापरण्यात आल्याची माहिती परिषदेच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. मात्र काही गाड्या वडवली येथील डोंगरावर, काही गाड्या मोकळ्या जागेत अनेक महिने धुळखात पडल्याचे समोर आले आहे. आता या गाड्या पालिका प्रशासनाने भंगारात विक्रीसाठी काढल्या आहेत. या गाड्यांसाठी परिषदेच्या तिजोरीतून सुमारे अडीच कोटी खर्च झाल्याची माहिती आहे.

# कल्याण व भांडुप परिमंडलात वीज वितरण यंत्रणेच्या पावसाळापूर्व देखभाल-दुरुस्ती कामांना वेग

**कल्याण, दि. ९ : प्रतिनिधी**

कल्याण आणि भांडुप परिमंडलात वीज वितरण यंत्रणेच्या पावसाळापूर्व देखभाल-दुरुस्तीच्या कामांना वेग देण्यात आला आहे. या कामांमुळे पावसाळापूर्व वादळवारा व मान्सुनच्या सुरुवातीला खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याची तीव्रता कमी होण्यास मदत मिळेल. संबंधित भागातील वीज ग्राहकांना पूर्वकल्पना देणारे मेसेज त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर पाठवून त्या-त्या भागात देखभाल-दुरुस्तीची कामे करण्यात येत असून या कामांसाठी सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.



देखभाल-दुरुस्तीच्या कामातून वीज वितरण यंत्रणेची कार्यक्षमता व जीवनमान वाढण्यास मदत होते. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यापूर्वी साधारणत: एप्रिल आणि मे महिन्यात वीज वितरण यंत्रणेची कामे केली जातात. त्यानुसार कल्याण आणि भांडुप परिमंडलात यावर्षी तापमानाचा पारा चाळीशी पार झालेला असतानाही महावितरणचे कर्मचारी, कंत्राटी कामगार आणि कंत्राटदाराचे (एजन्सी) कामगारांनी रणरणत्या उन्हात देखभाल-दुरुस्तीची कामे केली आहेत. देखभाल-दुरुस्तीच्या कामांसाठी विभागनिहाय इनपॅनलमेंट एजन्सीची (कंत्राटदार) नियुक्ती करण्यात आली आहे. महावितरणचे नियमित कर्मचारी, बाह्यस्रोत (कंत्राटी) कामगार आणि एजन्सीच्या कामगारांकडून एकत्रितपणे देखभाल-दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.

देखभाल व दुरुस्तीच्या कामांमध्ये वीज वितरण रोहित्र (डीपी), उपकेंद्र तसेच उच्चदाब व लघुदाब वीज वाहिन्यांची कामे तसेच वीज वितरण यंत्रणेत अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात येते. सर्वेक्षणानंतर आवश्यक कामांची निवड करून स्वंयचलित एनडीएम प्रणालीत संबंधित काम व भागांची माहिती भरण्यात येते. त्यानुसार संबंधित भागातील वीज ग्राहकांना प्रणालीमार्फत वीज बंद ठेवण्यात येणाऱ्या कालावधीबाबत पूर्वकल्पना देणारे मेसेज त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर पाठवले जातात. कल्याण व भांडुप परिमंडलातील ग्राहकांनी देखभाल-दुरुस्तीच्या अत्यावश्यक कामात सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# लहान आकारमानाचे पापलेट मासे पकडल्या प्रकरणी दोन नौकांवर कारवाई

## पापलेट क्षेत्र असलेल्या पालघर जिल्ह्यात नियमनासाठी पथक तैनात

**पालघर, दि. ९ : प्रतिनिधी**

उत्तन कार्यक्षेत्रात नौका तपासणीवेळी किमान कायदेशीर आकारमानापेक्षा कमी आकारमानाची चंदेरी पापलेट मासळी पकडल्या प्रकरणी दोन नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमन १९८१ (सुधारणा २०२१) अंतर्गत संयुक्त कारवाई करण्यात आली आहे. तसेच पापलेट क्षेत्र असलेल्या पालघर जिल्ह्यांतर्गत एमएलएस नियमनासाठी वर्ग १ व वर्ग २ अधिकाऱ्यांचे पथक तैनात करण्यात आले असून या पथकामार्फत कमी आकारमानाची मासळी पकडणाऱ्या नौकांवर कारवाई करण्यात येत असल्याचे मत्स्यव्यवसाय विभागामार्फत कळवण्यात आले आहे.

कमी आकारमानाची मासळी पकडण्याविषयी घातलेल्या निर्बंधांच्या अंमलबजावणीसाठी अंमलबजावणी कक्षाचे अध्यक्ष व सचिव, सहआयुक्त महेश देवरे आणि प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई नागनाथ भादुले यांच्यामार्फत गस्ती नौकांच्या माध्यमातून कार्यवाही करण्यात येत आहे.

पारंपरिक माच्छिमारांच्या हिताचे संरक्षण आणि शाश्वत मासेमारीसाठी केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्थेने ५८ प्रजातींच्या किमान कायदेशीर आकारमानाबाबत शिफारस केली आहे. त्याप्रमाणे अपरिपक्व मासे पकडणे टाळण्यासाठी कोवळ्या माशांची मासेमारी करण्यावर कृषी व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाच्या २ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या आदेशाने ५४ प्रजातीच्या किमान कायदेशीर आकारमानाचे विनियमन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ (सुधारित – २०२१) कलम १७(८)(अ) व (ब) नुसार कायदेशीर आकारमानापेक्षा कमी आकारमानाच्या माशांच्या मासेमारी बंदीच्या उल्लंघनासाठी दंडात्मक कारवाईची तरतुद आहे. तसेच या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (सागरी), मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली ७ सागरी जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, सागरी जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी व पोलीस अधिक्षक यांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेला एक तात्पुरता अंमलबजावणी कक्ष स्थापन करण्यात आला असून यासमितीचे सदस्य सचिव, प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय, कोकण विभाग हे आहेत.

# भिवंडीमध्ये अनियमित पाणी पुरवठ्याने होत आहेत नागरिकांचे हाल

**भिवंडी, दि. ९ : प्रतिनिधी**

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात अनेक ठिकाणी अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचे हाल होत असून पालिकेचे अधिकारी जुन्या जलवाहिनीचे कारण देत आहेत. तर महानगरपालिकेकडे मुबलक पाणी असून शहरात होणारी पाणी चोरी आणि पाणीपुरवठ्याचे नियोजन नसल्याने हि अनियमितता असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. वर्षभरात ठिकठिकाणाहून पाण्याच्या तक्रारी पालिकेकडे येत असून कधी-कधी पाण्यासाठी मोर्चे देखील काढले जात आहे. या तक्रारीची महानगरपालिका प्रशासनाने गंभीर दाखल घेऊन उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून वाढत आहे. भिवंडी महानगरपालिका हद्दीत असलेल्या नैसर्गिक स्रोताकडे पालिकेचे दुर्लक्ष असल्याने शहरातील नागरिकांची पाण्याची गरज भागविण्यासाठी पालिका प्रशासन गेल्या काही वर्षांपासून विविध संस्थांकडून पाणी विकत घेत आहे. सध्या महानगरपालिका स्टेमकडून ७३ एमएलडी,मुंबई महानगरपालिकेकडून ४२ एमएलडी पाणी विकत घेत आहे. त्यामध्ये वऱ्हाळा तलावाचे ५ एमएलडी पाण्याची भर घालीत शहरातील नागरिकांना १२० एमएलडी पाणी पुरवठा करीत आहे.हा पाणी पुरवठा करण्यासाठी महापालिकेने शहरात गरजेनुसार १३ पाण्याच्या टाक्या बांधल्या आहेत. एस.टी.स्थानका जवळ २, चाविंद्रा १,इंदिरागांधी रुग्णालय २,शांतीनगर १,नवीवस्ती १,कामतघर १, नारपोली १, साठेनगर १, वऱ्हाळातलाव २,नागाव १ अशा पाण्याच्या टाक्यांमधून सध्या शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा होत आहे. त्यापैकी नागाव येथील पाण्याची टाकीचे बांधकाम कमकुवत झाल्याने पाडण्यात आली.त्यामुळे १२ टाक्यांमधून हा पाणीपुरवठा होत आहे.या सर्व भागात लोकवस्ती वाढल्याने टप्प्याप्प्याने टाकीत पाण्याची साठवणूक करून नागरिकांना दूरदूरवर पाणीपुरवठा केल्याने या पाण्यास प्रेशर नसतो. त्यामुळे नागरिकांना कमीअधिक प्रमाणात पाणी मिळते.नागरिकांना पाणी मिळावे म्हणून पालिकेने काही ठिकाणी बूस्टर लावले आहेत. या पाणी पुरवठ्यास उच्च दाब (प्रेशर) नसल्याने शहरातील जवळजवळ सर्वच नागरिकांना विजेच्या मशीनद्वारे पाणी खेचून घरात आणावे लागते.तर काही नगरसेवकांच्या हस्तक्षेपांमुळे त्यांच्या वार्डात जास्तवेळ पाणी पुरवठा असतो. परिणामी इतरांना कमी वेळेत पाणी मिळते. या सर्व बाबींकडे पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने गांभीर्याने घेऊन सर्वांना समान पाणीपुरवठा केला पाहिजे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत लोकांची विश्रांतीची वेळ असल्याचे जाहीर करीत सार्वजनिक कामांवर हस्तक्षेप केला आहे. असे असताना महापालिकेकडून काही ठिकाणी रात्रीच्या वेळी पाणीपुरवठा करून नागरिकांच्या स्वास्थावर घाला घातला जात आहे. अशा स्थितीत पालिका अनेक सोसायटीच्या प्रत्येक सदनिकाधारकांकडून पाणीपट्टी वसूल करीत आहे आणि सोसायटीकडून देखील पाणीपट्टी वसूल करीत आहे. शहरातील नागरिकांना नियमित आणि वेळेवर पाणी पुरवठा व्हावा यासाठी महापालिकेने आपल्या क्षेत्रात एकूण १६ नवीन पाण्याच्या टाक्या बांधल्या आहेत.तर २ नवीन पाण्याच्या टाक्या बांधण्याचे पालिकेचे प्रयोजन आहे. मात्र या पाण्याच्या टाक्यात गेल्या अनेक वर्षात पाणी सोडण्यात आले नाही. या टाक्यांमध्ये वेळेवर पाणी सोडण्यात आले असते तर परिसरातील प्रत्येक नागरिकांना प्रेशरने पाणी मिळाले असते. मात्र या टाक्या सुरु करण्यासाठी मागील दहा वर्षात निवडून आलेल्या नगरसेवकांनी स्वारस्य दाखविले नाही. काही महिन्यापूर्वी केंद्र शासनाच्या अमृत-२ योजनेंतर्गत भिवंडी शहरात नव्याने १०० एमएलडी पुरवठ्यासाठी नवीन जलवाहिनीचे काम सुरु झाले आहे. या नवीन अतिरिक्त पाणीपुरवठ्यामुळे मनपाने नव्याने बनविलेल्या १६ टाक्यांमध्ये पाणी साठवून नागरिकांना पुरविले जाणार आहे. मात्र नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची चोरी थांबली तरच नागरिकांना नियमित पाणी मिळणार आहे. यासाठी महापालिकेचा कस लागणार असून नागरिकांनी जागृत राहिले तरच हे शक्य होणार आहे.

> भिवंडीच्या नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी नव्याने महापालिकेने १६ टाक्या बांधल्या असून त्यामध्ये पाण्याची साठवणूक करण्यासाठी शासनाकडून १०० एमएलडी पाणी मंजूर केले आहे. हे पाणी भादसा-पिसे धरणातून उचलले जाणार असून हे पाणी शहरातील विविध भागात पोहोचविण्यासाठी केंद्रशासनाच्या अमृत -२ योजनेच्या निधीतून काम सुरु झाले आहे. हे काम येत्या दोन वर्षात पूर्ण होईल. तेंव्हा शहरातील सर्व भागातील नागरिकांना नियमित आणि प्रेशरने पाणी मिळेल.
>
> **- भिवंडी महापालिका, कार्यकारी अभियंता - संदीप पटनावर**

# अंबरनाथसाठी 20 कोटींचा निधी मंजूर

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नांना यश

**अंबरनाथ, दि. ९ प्रतिनिधी**

अंबरनाथ शहरातील उद्याने, रस्ते आणि ग्रंथालयासाठी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने तब्बल २० कोटी ५१ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. यात पूर्व पश्चिम भागातील दोन उद्याने, पश्चिमेतील रस्ता, संयुक्त अग्नीशमन केंद्र अशा विविध कामांचा समावेश आहे. या कामांमुळे अंबरनाथमधील उद्यानांचे सुशोभिकरण करणे सोपे होणार आहे. शहरातील इतर उद्यानांचा चेहरामोहरा बदलण्याची मागणी डॉ श्रीकांत शिंदे यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली होती. त्यांच्या या मागण्या मान्य करत डॉ. श्रीकांत शिंदे यांनी नगरोत्थान महाअभियानातून अंबरनाथ शहरासाठी निधी मिळावा अशी मागणी केली होती. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही मागणी मान्य करत त्यासाठी सकारात्मक निर्णय घेतले. त्यांच्या याच प्रयत्नामुळे अंबरनाथ शहरासाठी तब्बल २० कोटी ५१ लाख रूपयांचा निधी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नगरोत्थान महाअभियानाच्या माध्यमातून उपलब्ध झाला आहे. अंबरनाथ पूर्वेतील साई सेक्शन परिसरात असलेल्या उद्यानासाठी ३ कोटी ७१ लाख ५९ हजार मंजूर झाले आहेत. तर अंबरनाथ पश्चिम भागातील शंकर हाईट्स येथील उद्यानाच्या सुशोभिकरणासाठी ३ कोटी ७४ लाख ९९ हजार मंजूर करण्यात आलेले आहेत. अंबरनाथच्या मध्यवर्ती भागातील मधु मंगेश कर्णिक उद्यानात ग्रंथालय उभारण्याच्या कामासाठी १ कोटी २३ लाख ६८ हजार रूपये मंजूर झाले आहेत. त्याचवेळी पश्चिमेतील सर्वोदयनगर येथील आरक्षण क्र. ८७ वर उद्यान विकसीत करण्यासाठी १ कोटी ७२ लाख रूपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे अंबरनाथ शहरातील चार उद्याने वेगळ्या अर्थाने विकसीत होणार आहेत.

**रस्त्याचेही कॉंक्रिटीकरण होणार**

अंबरनाथ पश्चिमेतील वाधवा कॉम्प्लेक्स ते नाना पाटील चौक हा रस्ता वर्दळीचा आणि महत्वाचा आहे. या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणासाठी निधीची मागणी करण्यात आली होती. खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नांतून २ कोटी ९९ लाख ४१ हजार रूपये मंजूर करण्यात आले आहेत. तर अंबरनाथ आणि कुळगाव बदलापूर नगरपालिकांच्या संयुक्त अग्नीशमन केंद्रासह ७० एएलपी वाहने उभी करण्यासाठी केंद्र व निवास व्यवस्था उभारण्याचे काम केले जाणार आहे. त्यासाठी २ कोटी ७२ लाख ५६ हजार मंजूर करण्यात आल्याची माहिती खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली आहे. जांभिवलीगाव व जांभिवलीपाडा येथील हिंदू स्मशानभूमीचे नुतनीकरण व सुशोभीकरण करण्याचे काम केले जाणार असून त्यासाठी १ कोटी ४२ लाख ७३ हजार रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

अंबरनाथ पश्चिमेतील मदनसिंग मनवीरसिंग गार्डन, वुलनचाळ येथे बहुउद्देशीय सभागृह बांधण्यात येणार आहे. त्यासाठी तब्बल २ कोटी ६१ लाख ९२ हजार रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या परिसराती महिला, युवक यांना या बहुद्देशीय सभागृहाचा मोठा फायदा होणार आहे. हे भविष्यातील सांस्कृतिक केंद्र ठरू शकते.

# दुचाकीच्या अपघातात महिलेचा मृत्यू

**वसई, दि. ९ : प्रतिनिधी**

विरार पूर्वेच्या नारिंगी बायपास रोडवर रस्त्यावरील खडीमुळे दुचाकी घसरून अपघात झाला. या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला, तर एक जण जखमी झाला आहे. कुसुमलता कनोजिया असे त्यामहिलेचे नाव आहे. विरार पश्चिमेच्या विराटनगर येथे राहणारे शशांक प्यारेलाल कनोजिया हे दुचाकीवरून त्यांची आई कुसुमलता कनोजिया यांनाघेऊन विरार पूर्व येथे जात असताना नारिंगी बायपास रोड येथील रस्त्यावर असलेल्या खडीमुळे दुचाकी घसरून अपघात झाला. यात कुसुमलता कनोजिया यांना गंभीर दुखापत झाल्याने मृत्यू त्यांचा झाला. तर शशांक कनोजिया हे जखमी झाले आहेत. याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात शशांक कनोजिया याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वसईत तरुणाची आत्महत्या

**वसई, दि. ९ : प्रतिनिधी**

वसई पूर्वेच्या अग्रवाल, मधुबन परिसरात राहणाऱ्या एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अथर्व नवनाथ डांगले असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. आत्महत्यचे निश्चित कारण अजून समोर आले नसून याबाबत त्याच्या आईचा जबाब नोंदवण्यात आला आहे.

# प्लास्टिक वापराविरोधात दंडात्मक कारवाई

**भाईंदर, दि. ९ : प्रतिनिधी**

मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत प्लास्टिक वापराविरोधात दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. बुधवारी महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्लास्टिक वापर विरोधात मोठी कारवाई करण्यात आली. घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी प्लास्टिक बॅग, आणि "सिंगल युज प्लास्टिक" विक्री करणाऱ्यांवर कारवाई करून वीस हजार रुपये आणि अस्वच्छता केल्याबद्दल एक हजार रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग निर्णयानुसार आता महाराष्ट्र राज्यात एक वेळ वापरून फेकून देण्याच्या एकल प्लास्टिक वापरावर बंदी आहे. शहरातील भाजी विक्रेते, दुकानदार सर्रास प्लास्टिक बॅग चा वापर करताना दिसून येतात. त्याचप्रमाणे "युज अँड थ्रो" च्या डब्या, प्लेट्स, ग्लासेस, शोभेच्या माळा, थर्माकोल, इत्यादी वापराच्या वस्तू सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रक्रिया प्रकल्पावर मोठ्या प्रमाणात दररोज जमा होत आहेत. त्याठिकाणी मनुष्य बळ वापरून हे प्लास्टिक वेगळे करण्यात येत आहे. त्यामुळे कामगारांच्या देखील आरोग्याचा आणि एकंदरीत या शहराच्या आरोग्याचा मोठा पर्यावरणीय प्रदूषणाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन, स्वच्छता निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या उपस्थितीत लिपिक, मुकादम, फेरीवाला पथक कर्मचारी, भरारी पथक यांच्या सहकार्याने प्लास्टिक विक्री करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात आली. अंदाजे २५ किलो प्लास्टिक कारवाई दरम्यान जप्त करण्यात आले आहे. त्याचबरोबर प्लास्टिकचा वापर करणारे विक्रेते व नागरिकांकडून 25 हजार रुपये इतका दंड वसुल करण्यात आला आहे.

"सिंगल युज प्लास्टिक" च्या वापरावर महाराष्ट्र शासनमार्फत बंदी आहे. तसेच यामुळे पर्यावरणाला देखील हानी पोहचत आहे. म्हणून "सिंगल यूज प्लास्टिक" ची विक्री करणे तसेच वापर करणे शहरातील दुकानदार, फेरीवाले व नागरिकांनी टाळावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांच्या वतीने करण्यात आले आहे.


## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

### पाणी पुरवठा विभाग

**जाहिर सर्व साधारण निविदा सुचना क्र. ०३, सन २०२५-२६.**

उल्हासनगर महानगरपालिका खालील नमूद कामांकरीता योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहिर सर्व साधारण निविदा बी - १ नमून्यात मागवीत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | अनामत रक्कम | कोऱ्या निविदा प्रतिची किंमत (१८% GST सह) | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर १ मधील पॅ.क्र. १ येथील शिवबापु यांच्या घरापासुन ते राकेश पाटील यांच्या घरापर्यंत आणि विश्राम भवन ते अभिमन्यु गायकवाड यांच्या घरा पर्यंत व परिसरात जीर्ण जलवाहिनी बदलुन ५०/८० मी.मी व्यासाची नविन जी. आय जलवाहिनी बसविणे. | रु. ४.१५,९५३/ | रु. ४,१६०/- | रु. ५९०/- | ३० दिवस |
| २ | उल्हासनगर ५ कुर्ला कॅम्प संजय जिम ते जनता ऑटो गॅरेज येथील परिसरात जे. एन. एन. यु. आर. एम. झोन कार्यान्वित करण्याकरीता जलवाहिनी स्थलांतरीत करणेकरीता १०० मी. मी. व्यासाची डी. आय. के. ७जलवाहिनी टाकणे. | रु. ४,१०,९६७/- | रु. ४,११०/- | रु. ५९०/- | ३० दिवस |
| ३ | उल्हासनगर ४ सोनार चौक ते गणपती मंदिर पर्यंत एम. एम. आर. डी. ए. कडुन कॉंक्रीट रस्ता होत असल्याने जलवाहिन्या स्थलांतरीत करणे बाबत. | रु. ४,९८,२७२/- | रु. ४,९८३/- | रु. ५९०/- | ३० दिवस |
| ४ | उल्हासनगर ४ व ५ मधील बंजारा कॉलनी, सेक्शन २८, बॅरेक नं. २०९८ व २०४८, गंगोत्री बंगल्या समोर भाटीया चौक, श्रीराम नगर येथील विविध ठिकाणी ५०/१०० मी.मी.य व्यासाची नादुरुस्त जलवाहिनी बदलुन नविन जलवाहिनी टाकणे. | रु. २,४१,७६४/- | रु. २,४१८/- | रु. ५९०/- | ३० दिवस |
| ५ | उल्हासनगर ४ व्हिनस चौक ते गोविंद पॅलेस येथील परिसरात जे. एन. एन. यु. आर. एम. झोन कार्यान्वित करण्याकरीता जलवाहिनी स्थलांतरीत करणेकरीता १०० मी. मी. व्यासाची डी.आय. के. ७ जलवाहिनी टाकणे. | रु. ४,२३,०७६/- | रु. ४,२३१/- | रु. ५९०/- | ३० दिवस |
| ६ | उल्हासनगर ५ गेमनानी कंपाऊड ते पाले टॅपिंग येथील अनधिकृत नळजोडण्या खंडीत करणे. | रु. ६,७५,३७२/- | रु. ६,७५४/- | रु. ५९०/- | ३० दिवस |
| ७ | उल्हासनगर ४ मधील गुरुद्वारा, लालचक्की स्टेशन रोड, तक्षशिला उंच जलकुंभ व्हिनस रोड, भाटीया मटेरीयल सप्लाय समोर येथील विविध ठिकाणी २००/२५०/३०० मी.मी. व्यासाची स्लुस व्हॉल्व, ३५० मी.मी. व्यासाची बटरफ्लाय व्हॉल्व, १५/२०/२५/५०/६५/८०/१०० मी. मी. व्यासाची एअरव्हॉल्व व ८० मी.मी. व्यासाची नादुरुस्त व्हॉल्स व जलवाहिनी बदलुन नविन जलवाहिनी टाकणे. | - रु. ५,७४,२१५/- | रु. ५,७४२/- | रु. ५९०/- | ३० दिवस |
| ८ | उल्हासनगर ४ मधील गुजराती पाडा व हनुमान मंदिर येथील १०० मी.मी. व्यासाची नादुरुस्त जलवाहिनी बदलुन नविन जलवाहिनी टाकणे. | रु. ४,२०,३३४/- | रु. ४,२०३/- | रु. ५९०/- | ३० दिवस |

अटी व शर्ती :-

१) या कामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दिनांक ११/०४/२०२५ पासून दिनांक २५/०४/२०२५ पर्यत दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
२ ) सीलबंद निविदा दिनांक २८/०४/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात स्वीकारण्यात येतील.
३) मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २९/०४/२०२५ रोजी दु. ०३.०० नंतर शक्य झाल्यास अथवा इतर सोयीच्या दिवशी उपस्थित निविदाधारक किंवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.
४) अटी व शर्ती युक्त निविदाचा विचार केला जाणार नाही.
५) कामांची देयके निधी उपलब्धतेनुसार अदा करण्यात येतील.
६) प्रत्यक्ष कार्माची ठिकाणे पाहून निविदा भराव्यात.
७) प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क उल्हासनगर महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.
८) २% सुरक्षा अनामत रक्कम देयकातून वजा करण्यात येईल
९) सदरच्या अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये GST पकडण्यात आलेली नाही.
१०) देयकास लागणारी GST रक्कम स्वतंत्रपणे देण्यात येईल.
११) निविदा अंतिमतः स्विकारणे / नाकारणेचे अधिकार मा. आयुक्तांचे राहतील.

सही/-
(किशोर गवस )
अतिरिक्त आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

**जा.क्र. उमपा / पीआरओ/30/2025**
**दिनांक :- ०९/०४/२०२५**









## 'छोरी २'...







## रसि...









# सेन्सेक्स-निफ्टी पुन्हा कोसळले

## गुंतवणूकदारांना अडीच लाख कोटींचे नुकसान



**मुंबई, दि. ९ प्रतिनिधी**

भारतीय शेअर बाजार बुधवार, ९ एप्रिल रोजी मोठ्या घसरणीसह बंद झाला. सेन्सेक्स जवळजवळ ४०० अंकांनी घसरला. त्याच वेळी, निफ्टी २२,४०० च्या खाली आला. आयटी, मेटल, फार्मा आणि पीएसयू बँकांच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली. यामुळे आज गुंतवणूकदारांना सुमारे अडीच लाख कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले.

आरबीआयने चालू आर्थिक वर्षासाठी जीडीपी वाढीचा अंदाज ६.७ टक्क्यांवरून ६.५ टक्के केला तेव्हा गुंतवणूकदारांचे मनोबल आणखी कमकुवत झाले. याशिवाय, आज भारतीय वस्तूंवर अमेरिकेने २६% कर लागू केल्यामुळे गुंतवणूकदार सावध दिसले. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकही १ टक्क्यांनी घसरून बंद झाले. सेन्सेक्स ३७९.९३ अंकांनी घसरून ७३,८४७.१५ वर बंद झाला. निफ्टी १३६.७० अंकांनी घसरून २२,३९९.१५ वर बंद झाला.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे

**सेन्सेक्स 73,847**

**निफ्टी 22,399**

एकूण बाजार भांडवल आज ९ एप्रिल रोजी ३९३.९६ लाख कोटी रुपयांवर घसरले, जे मागील दिवशी म्हणजेच सोमवार, ८ एप्रिल रोजी ३९६.५७ लाख कोटी रुपयांवरून कमी झाले. सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल आज सुमारे २.६१ लाख कोटी रुपयांनी कमी झाले आहे.

सेन्सेक्समधील ३० पैकी १३ शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये नेस्ले इंडियाच्या शेअर्समध्ये सर्वाधिक ३.२४ टक्के वाढ झाली. यानंतर, हिंदुस्तान युनिलिव्हर (HUL), पॉवर ग्रिड, टायटन आणि अल्ट्राटेक सिमेंटचे शेअर्स ०.९५ टक्क्यांपासून ते २.५२ टक्क्यांपर्यंत वाढीसह बंद झाले.

सेन्सेक्समधील उर्वरित १७ शेअर्स आज घसरणीसह बंद झाले. यामध्येही स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) चा शेअर सर्वाधिक ३.४० टक्क्यांनी घसरला. तर टेक महिंद्रा, लार्सन अँड टुब्रो (एल अँड टी), टाटा स्टील आणि सन फार्मा यांचेही शेअर्स घसरले.

# चीनवर 104 टक्के अतिरिक्त शुल्क लागू

**वॉशिंग्टन, दि. ९ प्रतिनिधी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनला मोठा झटका दिला आहे. त्यांनी चीनवर १०४ टक्के अतिरिक्त शुल्क लागू करण्याची घोषणा केली. हे शुल्क मंगळवारी मध्यरात्रीपासून लागू झाले. यामुळे अमेरिका आणि चीनमध्ये ट्रेड वॉर तीव्र झाले आहे. तसेच यामुळे जगावर आर्थिक संकटाचे सावट घोंघावू लागले आहे.

२ एप्रिल रोजी अमेरिकेच्या टॅरिफ घोषणेनंतर चीनने त्याला प्रत्युत्तर म्हणून ३४ टक्के शुल्क लागू केले. या घडामोडीनंतर ट्रम्प यांनी चीनला धमकी दिली होती की जर त्यांनी हे शुल्क मागे घेतले नाही तर त्यांच्यावर अतिरिक्त शुल्क लागू केले जाईल. आता ट्रम्प प्रशासनाने दिलेली ही धमकी खरी करुन दाखवली.

मंगळवारी व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन लेविट यांनी पुष्टी केली होती की ९ एप्रिल रोजी चीनच्या आयात उत्पादनावर अतिरिक्त १०४ टक्के कर लागू होईल. मंगळवारी झालेल्या पत्रकार परिषदेत, लेविट यांनी ट्रम्प यांच्या भूमिकेचा पुनरुच्चार करताना सांगितले की चीनचा डील करण्याचा विचार आहे.



फॉक्स न्यूजच्या वृत्तानुसार, ट्रम्प जशास तसे म्हणजेच रेसिप्रोकल शुल्क लागू करतील, हे चीनला अपेक्षित होते. चीनने व्हाईट हाऊसशी करार करण्यास नकार दिल्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त १०४ टक्के शुल्क लागू केल्याचे मानले जात आहे.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, चीनने अमेरिकेच्या आयात उत्पादनांवर ३४ टक्के परस्पर शुल्क लागू केले. आमची अखेरपर्यंत लढाई सुरु राहील, अशी शपथ त्यांनी घेतली. हे "ब्लॅकमेल" असल्याचा उल्लेख करत, आम्ही टॅरिफ धमक्यांना घाबरत नसल्याचा इशारा त्यांनी दिला होता.

दरम्यान, ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या भारतीय उत्पादनांवरील २६ टक्के शुल्काचा (टॅरिफ) निर्णय बुधवारी सकाळी ९:३० वाजता अधिकृतपणे लागू झाला. ''भारताचे धोरण खूप, खूप कठोर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी नुकतेच येऊन गेले. ते माझे खूप चांगले मित्र आहेत, पण तुम्ही आमच्याबद्दल योग्य असा निर्णय घेत नाही. ते आमच्याकडून ५२ टक्के शुल्क आकारतात आणि आम्ही त्यांना जवळजवळ काहीही आकारत नाही," असे ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसच्या रोझ गार्डनमधील "मेक अमेरिकन वेल्थी अगेन" कार्यक्रमात बोलताना म्हटले होते.

**जगासमोर मोठे आर्थिक संकट**

२०१८ मध्ये ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळातदेखील अमेरिका आणि चीनमध्ये टॅरिफ वॉर झाले होते. चीनवर दबाव आणणे आणि त्यांच्या व्यापार धोरणांत बदल घडवून आणणे हा यामागील उद्देश होता. आता २०२५ मध्ये ट्रम्प यांचे सरकार सत्तेत आल्यानंतर हे टॅरिफ वॉर पुन्हा तीव्र झाले आहे. यासोबतच जगभरात व्यापार युद्धाची भीतीही वाढली आहे.

# जम्मू-काश्मीर विधानसभेत वक्फ बिलावरून तिसऱ्या दिवशी राडा; 'आप'च्या आमदाराला मारहाण

**जम्मू, दि. ९ वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीर विधानसभा सभागृहात सलग तिसऱ्या दिवशी वक्फ विधेयकावरील चर्चेदरम्यान जोरगार राडा झाला. सभागृहाचे कामकाज सुरू होताच नॅशनल कॉन्फरन्सचे आमदार मुबारक गुल, भाजपाचे बलवंत सिंह कोटिया यांच्यासह अनेक आमदारांनी आपापल्या जागेवर उभे राहून त्यांच्या प्रस्तावावर चर्चेची मागणी केली. याचदरम्यान भाजपाचे आमदार आणि आम आदमी पक्षाचे एकमेव आमदार मेहराज मलिक यांच्यात हाणामारी झाली. या गदारोळात सभागृहाचे कामकाज दुपारी १ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.



सभागृहात गदारोळ झाल्यानंतर भाजपाचे आमदार विक्रम रंधावा यांनी आमदार मेहराज मलिक यांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, "मलिक यांनी हिंदूंचा अपमान केला. आम्ही हे सहन करणार नाहीत. ते म्हणाले की, हिंदू टिळा लावून पाप करतात. आम्ही त्यांना उत्तर देणारच."

सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्स आणि त्यांच्या सहयोगी पक्षानी वक्फ विधेयकावर चर्चा करण्यासाठी स्थगन प्रस्ताव मांडला. मात्र विधानसभेचे अध्यक्ष अब्दुल रहीम लाथर यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला.

दरम्यान जम्मू आणि काश्मीर विधानसभेचे विरोधी पक्षनेते सुनील शर्मा यांनी केंद्र सरकारवर आरोप केला की, मुख्य प्रश्नांवरून लक्ष हटविण्यासाठी भलतेच मुद्दे काढले जात आहेत. आम्ही रोजंदारी करणाऱ्या मजुरांचे वेतन, युवकांमधील बेरोजगारी यासारख्या प्रश्नांवर चर्चा करण्याची मागणी करतो होतो. पण सरकार या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी तयार नाही.

भाजपाने सांगितले की, आपचे आमदार मेहराज मलिक शिवीगाळ करत होते. भाजपा नेत्यांवर ते वारंवार आरोप करत राहिल्यामुळे भाजपा आमदारही त्यांच्यावर तुटून पडले. त्यानंतर हाणामारीचे हे लोण सभागृहाबाहेरही पोहोचले आणि त्यानंतर सेंट्रल हॉलपर्यंत याची चर्चा होती.

# भारतीय नौदलाची ताकद वाढणार; फ्रान्ससोबत मोठ्या संरक्षण कराराला मंजुरी



**नवी दिल्ली, दि. ९ वृत्तसंस्था**

भारतीय नौदलाच्या सामर्थ्यात लवकरच जबरदस्त भर पडणार आहे. भारत सरकारने फ्रान्सकडून तब्बल २६ राफेल सागरी लढाऊ विमाने खरेदी करण्याच्या कराराला मंजुरी दिली आहे. सुमारे ६३ हजार कोटी रुपयांचा हा करार लवकरच होऊ शकतो.

या करारांतर्गत भारतीय नौदलाला २२ सिंगल-सीटर आणि ४ ट्विन-सीटर असे एकूण २६ अत्याधुनिक राफेल सागरी लढाऊ विमाने मिळणार आहेत. ही जेट्स डसॉल्ट एव्हिएशन या फ्रान्सच्या नामांकित कंपनीकडून तयार करण्यात येणार आहेत.

ही विमाने भारतीय नौदलासाठी गेम-चेंजर ठरणार आहेत. समुद्रात शत्रूविरोधी मोहिमांमध्ये ही विमाने निर्णायक भूमिका बजावणार आहेत. विशेष म्हणजे, हे राफेल जेट विमानवाहू युद्धनौकांवरूनही ऑपरेट करता येणार आहेत, ज्यामुळे भारताची समुद्रावरची पकड आणखी मजबूत होणार आहे.

या करारामुळे भारताच्या नौदल आणि वायुदलाची क्षमता प्रचंड वाढणार असून चीन आणि पाकिस्तानसारख्या शत्रू राष्ट्रांवर सामरिक दबाव वाढवण्यास भारताला मदत होणार आहे. हा करार केवळ संरक्षणाच्या दृष्टीनेच नव्हे, तर भारताच्या जागतिक सामरिक शक्तीला एक नवीन ओळख देणारा ठरणार आहे.

# अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी मदरश्याच्या शिक्षकाला 187 वर्षांची शिक्षा

**कन्नूर, दि. ९ वृत्तसंस्था**

केरळमधील कन्नूर जिल्ह्यातील मदरशामध्ये शिक्षक असलेल्या एका व्यक्तीला १८७ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. करोना महामारीच्या काळात एका अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी ही शिक्षा सुनावण्यात आली आहे. कन्नूर जिल्ह्यातील तालिपरंबा सत्र न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी पोक्सो कायद्याअंतर्गत ही शिक्षा सुनावली गेली. आरोपी मुहम्मद रफी हा अलकोडे येथील रहिवासी असून त्याला ९ लाखांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२० ते २०२१ या काळात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाले. रफीने अल्पवयीन मुलीला अंगठी दाखवून तिचा विश्वास संपादन केला आणि मग तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केला. सदर प्रकरणी पझयांगडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले की, आरोपी हा अट्टल गुन्हेगार आहे. याआधीही त्याने अशाच प्रकारचा गुन्हा केला होता. वलापट्टणम पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात पूर्वी पोक्सोचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात जामीन मिळाला असताना त्याने कन्नूर जिल्ह्यात दुसरा गुन्हा केला.

मुहम्मद रफीला १८७ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली असली तरी भारतीय कायद्यानुसार त्याला ३० वर्ष कारावासात घालवावी लागू शकतात. तसेच त्याच्याकडून वसूल करण्यात आलेला दंड पीडितेला नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावा, असेही निर्देश न्यायालयाने दिले.

फेब्रुवारी महिन्यात बंगळुरूच्या हेगडे नगर येथे असाच एक प्रकार निदर्शनास आला होता. येथील एका मदरश्यात ११ वर्षांच्या मुलीवर अत्याचार करण्यात आला होता. १६ फेब्रुवारी रोजी वसतिगृह प्रमुखाचा मुलगा मोहम्मद हसन हा अल्पवयीन मुलीला लाथा-बुक्याने मारहाण करताना सीसीटीव्ही फुटेजमध्ये आढळून आला होता. तसेच भात सांडल्याच्या कारणावरून त्याने इतर मुलींशी वाद घातल्याचेही सीसीटीव्हीमध्ये दिसून आले.

आरोपी हसन हादेखील अल्पवयीन असल्यामुळे त्याची रवानगी बाल सुधारगृहात करण्यात आली असून बाल सुधार कायदे आणि भारतीय न्याय संहिता कायद्यानुसार त्याच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

# शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आरसीएफचे मोफत शिबीर

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स हि खत आणि कीटकनाशकांच्या निर्मितीत अग्रेसर असलेली राष्ट्रीय स्तरावरील एक नामांकित कंपनी आहे. आरसीफ सारख्या कंपनीचा व्यवसाय जरी खत निर्मितीचा असला तरी हीच कंपनी संपूर्ण वर्षभर देशातील शेतकऱ्यांप्रती सामाजिक बांधिलकी जपत त्यांच्याप्रती कृतज्ञता म्हणून शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजण करते. याच उपक्रमांचा भाग म्हणजे सध्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी आरसीएफ च्या वतीने सामाजिक बांधिलकी जपतच आरसीएफ ट्रेनिंग सेंटर सुरु करण्यात आले आहे. याच ट्रेनिंग सेंटर अंतर्गत शेतकऱ्यांना आपला कृषी विस्तार वाढविण्यासाठी मोफत मर्गदर्शन शिबिरांचे आयोजन देखील करण्यात येत आहे.




**लोकसेवार्थ**

महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाच्या वतीने नुकतेच रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात असलेल्या परहूर येथे कृषी फलोत्पादन परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रीय केमिक्लस अँड फर्टिलायझर्स चे थळ येथील कार्यकारी संचालक नितीन हिरडे यांनी शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून आपली शेती आधुनिक कशी करता येईल?आणि त्यासाठीच आरसीएफ शेतकऱ्यांना कशी मदत करेल? या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. या परिषदेचे अध्यक्ष चंद्रकांत मोकळं यांन आपल्या मार्गदर्शनपर भाषणात ,'वातावरणातील बदलामुळे एन हंगामात अवकाळी पावसामुळे आणि अति प्रचंड तापमानामुळे आंबा आणि सर्व प्रकारच्या उत्पादनात जवळपास ७० टक्क्यावरून ३० टक्के इतकी घट झाल्याने फालोत्पादक शेतकरी कसा अडचणीत आला आहे आणि त्यांच्या मदतीसाठीच आरसीफच्या वतीने कृषी विद्यापीठ आणि आयसीआर च्या वतीने पाठपुरावा सुरु असल्याचे' देखील मोकळं यांनी सांगितले. हवामान बदलामुळे आंबा उत्पादक शेतकरी अगोदरच हवालदिल असताना जे काही उत्पादन हाती येते ते एपीएमसी मार्केटमध्ये गेल्यानंतर तिथे शेतकऱ्यांची दलाल फसवणूक करतात. शेतकऱ्यांची अशी फसवणूक होऊ नये यासाठीच महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाने उत्पादक ते थेट ग्राहक अशी संकल्पना राबवून आरसीएफच्या मदतीने शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचा योग्य तो मोबदला मिळवून देण्यासाठी देखील प्रयत्न सुरु केले आहेत.

या परिषदेत रायगड जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी पावन कुमार नझुन,आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी डॉ . राकेश कवले,कोकण कृषी विद्यापीठ अंतर्गत कर्जत कृषी संशोधन केंद्राचे सहयोगी संचालक आणि कृषी शास्त्रज्ञ डॉ. एल. एस. चव्हाण,कर्जत कृषी संशोधन केंद्राच्या फलोत्पादन शास्त्रज्ञ प्रा. वैशाली सामंत आदींनी हवामान बदल,मसाले पीक,निर्यातक्षम फलोत्पादन,मातीचे आरोग्य,या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. आरसीएफ च्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्रातील जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये सातत्याने प्रत्यक्ष शेतीवर जाऊन कार्यशाळा घेतल्या जातात आणि अगदी माती परीक्षणापासून ते मातीचा पोत,पोषकता आणि पीक तसेच लागणारी खत आणि कीटकनाशक या संदर्भात देखील प्रात्यशिकासह मार्गदर्शन केले जाते. एकूणच शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचा आणि तंत्राचा मूलमंत्र देत पिकांच्या भरघोस उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करणाऱ्या आरसीएफ सारख्या सरकारी संस्थेचे हे उपक्रम म्हणजे शेतकऱ्यांना संकटाच्या काळात आधारच आहेत. एकूणच शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचा आणि तंत्राचा मूलमंत्र देत पिकांच्या भरघोस उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करणाऱ्या आरसीएफ सारख्या सरकारी संस्थेचे हे उपक्रम म्हणजे शेतकऱ्यांना संकटाच्या काळात आधारच आहेत.

**लोकजागर**

# टुटोर्त अकेडेमीची यशोगाथा

शिक्षण घेतल्यावर अनेकांचे मोठी नोकरी मिळवण्याचं स्वप्न असतं. पण काहीजण चांगली मिळालेली नोकरी सोडून पुन्हा व्यवसायाकडे वळत आहेत. आज आपण अशाच एका तरुणाची यशोगाथा पाहणार आहोत, ज्याने संघर्षातून स्वत:चं एक वेगळं विश्व निर्माण केलं आहे. मनू अग्रवाल असं या तरुण उद्योजकाचं नाव आहे. मनू अग्रवालने 2 कोटी रुपयांची नोकरी सोडून Tutort Academy ऑनलाइन प्लॅटफॉर्म सुरु केलाय.

मनू अग्रवालने गुगल आणि मायक्रोसॉफ्टसारख्या कंपन्यामध्ये नोकरी केली आहे. सुरुवातीच्या काळात अग्रवालला अनेक कपन्यांनी नोकऱ्या देण्यास नकार दिला होता. मात्र, नंतरच्या काळात त्यांनी अनेक चांगल्या कंपन्यामध्ये काम केलं. मनू अग्रवालला मायक्रोसॉफ्टमध्ये सुमारे 2 कोटी रुपयांचे पॅकेज मिळाले होते. पण, त्याने ही सोडून आपले स्टार्टअप Tutort सुरु करण्याचा निर्णय घेतला. मनू अग्रवाल यांचा मोठा संघर्ष आहे.



मोठ्या संघर्षातून त्यांनी हे यश मिळवलं आहे.

**शून्यातून विश्व**

मनू अग्रवाल हे मुळचे उत्तर प्रदेशातील झाशी या छोट्याश्या गावचे रहिवाशी होते. त्यांनी सुरुवातीचं त्याचं शिक्षण सरकारी शाळेत पूर्ण केलं. त्यानंतर बुंदेलखंड विद्यापीठातून त्यांनी बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स चं शिक्षण पूर्ण केलं. त्यानंतर त्यांनी नोकरी शोधायला सुरुवात केली मात्र, त्यांना काही नोकरी मिळाली नाही. अनेक कंपन्यांनी नकार दिला. काही कालावधी गेल्यानंतर त्यांना विप्रोमध्ये 10 हजार रुपयांची नोकरी मिळाली. नोकरी लागल्यानंतर मनू यांनी पुढच शिक्षण घेतलं. त्यांनी तिरुचिरापल्ली येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथून मास्टर्स इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (एमसीए) पदवी घेतली.

2016 मध्ये मनू अग्रवाल यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी घटना घडली. त्यांना मायक्रोसॉफ्ट या बड्या कंपनीत त्यांना इंटर्नशिप मिळाली. इंटर्नशिप पूर्ण झाल्यानंतर त्यांना मायक्रोसॉफ्टने सिएटल, वॉशिंग्टनमध्ये नोकरी दिली. सुरुवातीला मनूला 1.9 कोटी रुपयांचे पॅकेज मिळाले. त्यानंतर मनूने 2021 मध्ये नोकरी सोडून मित्र अभिषेक गुप्तासोबत Tutort Academy ऑनलाइन स्टार्टअप सुरु केले. आणि आज हाच मनु अग्रवाल ओनलाईन स्टार्टअप द्वारे आज कोट्याधीश बनलेला आहे. त्याची हि ओन्लाईन कंपनी आज जगभरातील नामांकित कंपन्या पैकी एक म्हणून नावाजली जात आहे.

**शब्दार्थ**

**GDP**

ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट (Gross Domestic Product) म्हणजेच एकूण देशांतर्गत उत्पादन म्हणजेच देशात निर्माण झालेली सर्वच उत्पादनं आणि सेवा यांची ठराविक कालावधीसाठी एकत्रित केलेली ठराविक चलनातील आकडेवारी म्हणजे एकूण देशांतर्गत उत्पादन होय.जीडीपीची आकडेवारी ही देशभरामध्ये दर तीन महिन्याला प्रदर्शित होते. देशांतर्गत झालेल्या उत्पादनांचा आणि सेवेचा जीडीपी चा दर ठरविण्यासाठी विचार केला जातो.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# गोध्रा हत्याकांडातील अल्पवयीन आरोपींना २३ वर्षांनी शिक्षा, बाल न्याय मंडळाने घेतला मोठा निर्णय

**पंचमहाल, दि. ९ वृत्तसंस्था**

गोध्रा येथे सुमारे २३ वर्षांपूर्वी घडलेल्या साबरमती एक्सप्रेस रेल्वे हत्यकांडाच्या प्रकरणात गुजरातच्या पंचमहल जिल्ह्यातील बाल न्याय मंडळाने त्या वेळी अल्पवयीन असलेल्या तीन जणांची तीन वर्षांसाठी बालसुधारगृहात रवानगी केली आहे. या हत्याकांडात ५९ कारसेवकांची हत्या झाली होती. त्यानंतर राज्यभरात दंगली उसळल्या होत्या. बाल न्याय मंडळाचे अध्यक्ष के एस मोदी यांनी तिघांना बालसुधारगृहात तीन वर्षांची शिक्षा सुनावली असून, प्रत्येकी १०,००० रुपये दंडही ठोठावला आहे. या तीनही आरोपींचे वय आता ४० च्या आसपास आहे.

२००२ च्या गोध्रा ट्रेन हत्याकांडावेळी आरोपी किशोरवयीन होते. या प्रकरणातील इतर दोन आरोपींना बाल न्याय मंडळाने निर्दोष मुक्त केले. घटनेच्या वेळी ते देखील किशोरवयीन होते. दोषींचे वकील सलमान चरखा यांनी सांगितले की, बाल न्याय मंडळाने तिन्ही दोषींची शिक्षा ३० दिवसांसाठी स्थगित केली आहे. जेणेकरून त्यांना उच्च न्यायालयात आदेशाविरुद्ध अपील करता येऊ शकेल.

२७ फेब्रुवारी २००२ रोजी गुजरातमधील गोध्रा येथे साबरमती एक्सप्रेसच्या एस-६ कोचला आग लावण्यात आली होती. यामध्ये ५९ जणांचा मृत्यू झाला होता. साबरमती एक्सप्रेसला आग लावण्याच्या घटनेनंतर संपूर्ण गुजरातमध्ये खळबळ उडाली होती. दुसऱ्या दिवशी म्हणजे २८ फेब्रुवारी २००२ पासून गुजरातच्या वेगवेगळ्या ठिकाणी जातीय दंगली पसरल्या. या दंगलींमध्ये १२०० हून अधिक लोक मृत्युमुखी पडले होते.

पुढे २०११ मध्ये या प्रकरणी गोध्रा येथील न्यायालयाने ३१ आरोपींना दोषी ठरवले आणि ६३ जणांना निर्दोष सोडले. कनिष्ठ न्यायालयाने ११ दोषींना फाशीची शिक्षा सुनावली होती, तर २० जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. ऑक्टोबर २०१७ मध्ये, गुजरात उच्च न्यायालयाने अनेक दोषींची शिक्षा कायम ठेवली आणि ११ जणांच्या फाशीच्या शिक्षेचे रूपांतर जन्मठेपेत केले होते.

# एमबीबीएस अंतिम परीक्षेत जुळ्या बहिणींना समान गुण

**सुरत, दि. ९ वृत्तसंस्था**

गुजरातमधील सुरत येथील जुळ्या रीबा आणि राहिन हाफेजी यांनी त्यांच्या एमबीबीएस अंतिम परीक्षेत समान गुण मिळवले. दोघांनाही 66.8% गुण मिळाले. गुलशाद बानूच्या मुलींनी कोचिंगशिवाय नीट-यूजी उत्तीर्ण केले. राहीनला शस्त्रक्रियेची आवड आहे तर रीबाला अंतर्गत औषधांमध्ये रस आहे. या 24 वर्षांच्या बहिणींचे शिक्षण आणि आयुष्याचे निर्णय नेहमीच सारखेच राहिले आहेत. त्याची आई गुलशाद बानू शिक्षिका आहे आणि तिने दोघांनाही



एकटीने वाढवले. बहिणींना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला, पण त्यांनी त्यांचे ध्येय सोडले नाही. त्यांना कुटुंबातील पहिली डॉक्टर बनण्याचे होते. कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय, दोन्ही बहिणींनी NEET-UG वैद्यकीय प्रवेश परीक्षेत चांगली कामगिरी केली. रीबाला 97 वा पर्सेंटाइल आणि राहीनला97.7 वा पर्सेंटाइल मिळाला.

राहीन म्हणते, की तिचे मामा डॉक्टर आहेत आणि त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन तिने मेडिकल शिकण्याचा निर्णय घेतला. लहानपणी, आम्ही नेहमी एकत्र अभ्यास करत असल्यामुळे आम्हाला जवळजवळ सारखेच गुण मिळायचे. GMERS मध्ये, त्या एकाच वसतिगृहाच्या खोलीत राहत होत्या आणि एकत्र लेक्चर अटेंड करत होते. रीबा म्हणते की त्यांना जामनगर किंवा भावनगरच्या सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळू शकला असता, पण दोघींनाही एकत्र राहायचे होते. म्हणून त्यांनी 2019 मध्ये GMERS निवडले. रीबा पुढे म्हणते की, ते सुरतजवळही होते. शिवाय, शहराबाहेर आम्ही एकटे राहण्याची ही पहिलीच वेळ होती. बहिणी म्हणतात की, त्यांना त्यांच्या आई आणि आजी-आजोबांकडून खूप पाठिंबा मिळाला आहे, ज्यामुळे त्या यशस्वी होऊ शकल्या आहेत.

# बनावट नावाने बाथरूम उत्पादने बनवणाऱ्यावर गुजरातमध्ये कारवाई



**मोरबी, दि. ९ वृत्तसंस्था**

बॉम्बे हायकोर्टाच्या आदेशाने JOHNSON ब्रँडच्या नावे बनावट उत्पादने विकणाऱ्यावर गुजरात येथील मोरबी येथे छापा टाकत 13,000 हून अधिक बनावट पॅकेजिंग जप्त करण्यात आले आहे.

कंपनीतर्फे देण्यात आलेल्या प्रसिद्धिपत्रकार म्हटले आहे की, आम्हाला आनंद आहे की आमच्या प्रसिद्ध JOHNSON ब्रँडवर अन्यायकारकपणे वापर होत असलेल्या "JOANSAN" नावाखाली बाथरूम उत्पादने पुरवणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. बॉम्बे हायकोर्टाच्या आदेशानुसार कोर्ट रिसीव्हर व पोलिसांच्या मदतीने छापा टाकण्यात आला. या छाप्यात 13,000 हून अधिक बनावट पॅकेजिंग कार्टन्ससह मोठ्या प्रमाणात निकृष्ट दर्जाची बाथरूम उत्पादने पोलिसांनी जप्त व सील केली आहेत. या कारवाईमुळे भविष्यात कोणीही आमच्या ब्रँडचा गैरफायदा घेऊ शकणार नाही याची खात्री झाली आहे, असे कंपनी तर्फे सांगण्यात आले आहे. या यशस्वी मोहिमेसाठी आमच्या लीगल, मोरबी, पीएमजी व सेल्स टीमचे समन्वयाबद्दल विशेष अभिनंदन, दरम्यान या कृतीमुळे प्रभावित बाजारपेठांमध्ये आमच्या विक्रीला नक्कीच चालना मिळेल, अशी अपेक्षा JOHNSON तर्फे व्यक्त करण्यात आली आहे.

# भारत २०३५ पर्यंत स्वतःचे 'भारत स्पेस स्टेशन' अंतराळात स्थापन करणार



**नवी दिल्ली, दि. ९ वृत्तसंस्था**

चांद्रयान, मंगळयान अशा यशस्वी मोहिमा केल्यानंतर आता चंद्रावर थेट अंतराळवीर उतरविण्यासाठी भारताकडून तयारी सुरू आहे. भारताचा अंतराळवीर चंद्रावर कधी पाऊल ठेवणार याबाबत विज्ञान-तंत्रज्ञान आणि अंतराळ विभागाचे केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी नुकतीच माहिती दिली. सीएनएन-न्यूज१८ च्या रायजिंग भारत समिटमध्ये बोलत असताना त्यांनी भारताच्या अंतराळ मोहिमांबद्दल माहिती दिली. ते म्हणाले, २०४० पर्यंत भारताचा अंतराळवीर चंद्रावर पाऊल ठेवेल. तसेच भारत स्पेस स्टेशन नावाचे भारताचे स्वतःचे अंतराळ स्थानक २०३५ पर्यंत तयार होईल, असेही त्यांनी सांगितले. "२०४० पर्यंत आम्ही चंद्रावर भारताचा अंतराळवीर उतरवू, अशी आम्हाला अपेक्षा आहे. तसेच २०३५ पर्यंत आपले स्वतःचे अंतराळ स्थानक तयार करण्याचाही भारत सरकारचा प्रयत्न आहे", असे विधान डॉ. जितेंद्र सिंह यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी रायजिंग भारत समितमध्ये सहभाग घेतला होता. आपल्या भाषणात त्यांनी फाळणीचा उल्लेख करत भारतातील मुस्लिमांनी फाळणीचा विरोध केला होता, असे सांगितले. पंतप्रधान मोदी म्हणाले, "ध्रुवीकरणाचे राजकारण नवे नाही. अनेक देशांना आजवर स्वातंत्र्य मिळाल्याचे आपण एकले. पण फाळणीतून एखाद्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्याचे एकले आहे का? तेव्हाच्या सामान्य मुस्लीम नागरिकांना दोन देश नको होते. पण सत्तेसाठी काँग्रेसने ध्रुवीकरणाचे राजकारण केले. पण सामान्य मुस्लिमांना काय मिळाले? हा मोठा प्रश्न आहे."

महासागर PALGHAR
RNI No.: MAHAMAR/2014/62313
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 208/B, Lokmanya Building, Near Taluka Panchayat Samiti Office, Palghar(W)-401404, Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK, Executive Editor- Shashi Karpe

महासागर पालघर
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे छापून २०८/बी, लोकमान्य बिल्डिंग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर पालघर (प.) ४०१४०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) कार्यकारी संपादक - शशी करपे (मो.नं. ९८९२९६८७२५) Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2014/62313